# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### वाहन उद्योगांवरील मंदीमुळे कर्मचारी बेरोजगार होत असल्याबाबत

**(१) ४८९ (१८-०३-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४४६९० ला दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये ऑटोमोबाईल इंडस्ट्री, जीएसटीचा भार, दुष्काळजन्य परिस्थिती, वाहन उद्योगांवर आलेली मंदी तसेच काही महिन्यांपासून वाहनांच्या विक्रीतील घट यामुळे लाखांहून अधिक कामगार, कर्मचाऱ्यांमध्ये रोजगार जाण्याची भिती निर्माण झाली आहे, असे मत उद्योग वर्तुळातून व्यक्त होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी औरंगाबादमधील सुमारे दोन हजार उद्योगांवर मंदीचे संकट असून या मंदीवर मात करण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.प. ७ (२)

**श्री.सुभाष देसाई (२३-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) उद्योग घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने उद्योग विभागामार्फत सामुहिक प्रोत्साहन योजना राबविली आहे. सध्या सामुहिक प्रोत्साहन योजना २०१९ शासन निर्णय दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ अन्वये राबविण्यात येत आहे. या योजनेचा कालावधी दिनांक १ एप्रिल, २०१९ ते दिनांक ३१ मार्च, २०२४ आहे.

त्यामध्ये उद्योग घटकाने केलेल्या गुंतवणुकीच्या ४० टक्के ते ८० टक्के पर्यंत प्रोत्साहन उद्योग घटकास पुढील नऊ/दहा वर्षांमध्ये देय केली जातात.

शासनाने दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या उद्योजकांकरीता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामुहिक प्रोत्साहन योजना राबविली असून, या योजनेंतर्गत उद्योग घटकांना भरीव प्रोत्साहने देण्याची तरतूद केली आहे. या योजनेचा कालावधी दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ ते दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ असा आहे.

शासनाने दिनांक १४ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण व विशेष प्रोत्साहन योजना राबविण्यास मान्यता दिलेली आहे. या योजनेचा कालावधी दिनांक १४ डिसेंबर, २०१७ ते दिनांक १३ डिसेंबर, २०२२ आहे.

शासन अधिसूचना दिनांक २१ ऑक्टोबर, २०१६ अन्वये औद्योगिक वापराकरीता विद्युत शुल्काचा दर ९.३ टक्के निश्चित करण्यात आला होता. शासनाच्या दिनांक १४ ऑगस्ट, २०२० च्या शासन अधिसूचनेन्वये औद्योगिक घटकाचे विद्युत शुल्क ९.०३ टक्के वरुन ७.५० टक्के इतके केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गैरव्यवहाराच्या प्रकरणावर कारवाई करण्याबाबत

**(२) १६३६ (१८-०३-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नॅशनल क्राईम रेकॉर्डस् ब्युरोच्या जाहीर झालेल्या आकडेवारीवरुन सन २०१६, २०१७ व २०१८ या तीन वर्षात राज्यात सर्वाधिक गैरव्यवहाराची प्रकरणे नोंदविली असून सन २०१८ मध्ये नोंद झालेल्या ९३० प्रकरणांपैकी माहे डिसेंबर, २०१९ च्या अखेरपर्यंत ३७४ प्रकरणांवरील सुनावणी पूर्ण होऊन केवळ ५६ जणांना म्हणजेच १५ टक्के प्रकरणामध्ये आरोपींना शिक्षा झाल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६, २०१७ व २०१८ मध्ये राज्यात गैरव्यवहाराची किती प्रकरणे निदर्शनास आली आहेत, उक्त प्रकरणावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व किती प्रकरणामध्ये आरोपींविरुध्द शिक्षेची कारवाई करण्यात आलेली आहे, उर्वरित प्रकरणामध्ये कारवाई अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२५-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

सन २०१८ मध्ये नोंद झालेली प्रकरणे ९३६ असून माहे डिसेंबर, २०१८ च्या अखेरपर्यंत ३७४ प्रकरणांवरील सुनावणी पूर्ण होवून ५६ प्रकरणांमध्ये शिक्षा झाली असून त्यांचे प्रमाण १५ टक्के आहे.

(२) राज्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे सन २०१६ मध्ये १०१६, सन २०१७ मध्ये ९२५ व सन २०१८ मध्ये ९३६ प्रकरणे दाखल आहेत. तसेच सन २०१६ मध्ये ९१, २०१७ मध्ये ५९ व २०१८ मध्ये ५६ प्रकरणांमध्ये शिक्षेची कारवाई करण्यात आली आहे.

वि.प. ७ (४)

१. मा.न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट असणे.
२. सक्षम प्राधिकरणाकडे मंजुरी करीता सादर.
३. प्रकरणे तपासाधीन.
४. अभियोगपूर्व मंजुरी अप्राप्त असल्याने.

(३) खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

१. लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील सर्व परिक्षेत्रिय/विभागाचे अधिकारी यांनी मा.जिल्हा न्यायाधीश यांना प्रत्यक्ष भेटून जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढण्याची विनंती करण्याबाबत मुख्यालयाकडून वेळोवेळी सूचित करण्यात येते.
२. लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील सर्व परिक्षेत्रिय/विभाग यांचेस्तरावर सरकारी अभियोक्ता, पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक तसेच पैरवी अधिकारी यांचे चर्चासत्र आयोजित करण्यात येते.
३. लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील सर्व परिक्षेत्रिय/विभाग यांचे पोलीस अधीक्षक मार्फतीने त्यांचे अधिनस्त अधिकारी व कोर्ट पैरवी कर्मचारी यांना निकालाचे (दोषसिध्दीचे) प्रमाण वाढविणे कामी वेळोवेळी सूचित करण्यात येते.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील अंतर्गत सर्व परिक्षेत्र/ विभाग यांच्या पोलीस अधीक्षक मार्फतीने कोर्ट पैरवी अधिकारी यांना जास्तीत जास्त समन्स बजावणी करुन तक्रारदार, फिर्यादी, पंच, साक्षीदार साक्षकामी न्यायालयाने दिलेल्या तारखांना वेळेवर हजर ठेवून खटल्यांची लवकरात लवकर सुनावणी होणेकामी सूचित करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान मानधन योजनेचा लाभ देण्याबाबत

**(३) १८१० (१८-०३-२०२०). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना उतारवयात नियमित उत्पन्न मिळावे म्हणून केंद्र शासनाने दिनांक ९ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री किसान मानधन योजना म्हणजे पेन्शन योजना सुरु केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचा लाभ १८ ते ४० वर्षे वयोगटातील दोन हेक्टरपर्यंत शेती असलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांना घेता येईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वयाची अट व दोन हेक्टरपर्यंत शेती असलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असल्यामुळे रायगड जिल्ह्यासह कोकणातील शेतकरी या योजनेपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यासह कोकणातील शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२२-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

प्रधानमंत्री किसान मानधन योजना ही केंद्र पुरस्कृत ऐच्छिक व अंशदायी पेन्शन योजना आहे. मार्गदर्शक सुचनांनुसार सर्व पात्र लाभार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकतात. रायगड जिल्ह्यात १०८१ नोंदणी केलेले लाभार्थी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बारामती (जि.पुणे) तालुक्यातील लाचखोरीचे प्रमाण रोखण्याबाबत

**(४) १८४९ (१८-०३-२०२०). श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारामती (जि.पुणे) तालुक्यात अटकपूर्व जामीन प्रकरणात मदत करण्यासाठी रुपये एक लाखाची मागणी करीत तडजोडीअंती तक्रारदाराकडून रुपये ५० हजारांची लाच स्वीकारताना बारामती तालुका पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक व पोलीस शिपाई यांना रंगेहाथ पकडण्यात आल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बारामती उपविभाग पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सातत्याने कारवाई होत असूनही या विभागात लाचखोरी सारख्या घटना वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाचखोरीचे प्रमाण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२२-०२-२०२१) :** (१) होय.

तक्रारदार श्री.चंद्रकांत चव्हाण यांचा मोठा भाऊ श्री.पोपट दत्तात्रय चव्हाण खंडोबानगर, मोरगांव रोड, बारामती यांच्याविरुध्द बारामती ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये दिनांक २८ डिसेंबर, २०१९ रोजी दाखल गुन्ह्यात बारामती न्यायालयात अटकपुर्व जामीन मंजुरीसाठी मदत म्हणून या प्रकरणातील तपासी अधिकारी श्री.बाळासाहेब जाधव, पोलीस उपनिरीक्षक, बारामती तालुका पोलीस ठाणे आणि पोलीस शिपाई श्री.अजिंक्य कदम यांनी पंचासमक्ष ५०,०००/- रुपयांची लाच रक्कम स्वीकारल्याचा गुन्हा घडला असून दोन्ही आरोपी लोकसेवकांविरुध्द बारामती पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ कलम ७, १२ अन्वये गु.र.क्र. २४/२०२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(२) होय.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांच्यामार्फत बारामती उपविभागातील पोलिसांविरुध्द सन २०१९ मध्ये एकूण ३ सापळा कारवाई व सन २०२० मध्ये वरीलप्रमाणे १ सापळा कारवाई अशा एकूण ४ सापळा कारवाई मागील दोन वर्षामध्ये करण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) आरोपी लोकसेवक श्री.बाळासाहेब जाधव, पोलीस उपनिरीक्षक व श्री.अजिंक्य लहू कदम, पोलीस शिपाई, बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण यांना उक्त सापळा कारवाईनंतर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे.

---

## पिंपळनेर (जि.सोलापूर) येथील बस स्थानकाची दुरुस्ती करण्याबाबत

**(५) २२६४ (१८-०३-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळनेर (जि.सोलापूर) येथील कुर्डुवाडी-टेंभुर्णा प्रमुख रस्त्यावरील प्रवाश्यांची वर्दळ असलेल्या बस स्थानकाच्या इमारतीची दुरवस्था झाल्याने प्रवाश्यांच्या जिवाला धोका निर्माण झाल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून पिंपळनेर ग्रामपंचायतीने याप्रकरणी अनेक वेळा शासनाकडे मागणी करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पिंपळेनर बस स्थानकाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२२-०२-२०२१) :** (१) व (२) पिंपळनेर येथे बस स्थानक नसून रस्ता हद्दीत प्रवासी निवारा आहे. सदर प्रवासी निवाऱ्याची राज्य परिवहन महामंडळाव्दारे पाहणी केली असून, तो नादुरुस्त असल्याचे आढळून

आले आहे. त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीच्या/सेवाभावी संस्थेच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत अथवा जाहिरातीचे हक्क देवून सदर शेडची आवश्यक ती दुरुस्ती/पुनर्बांधणी करणेबाबतच्या सूचना राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावरुन संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाने सरकारी वकिलांचे मानधन थकीत ठेवल्याबाबत

**(६) २५४७ (१८-०३-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.अरुणकाका जगताप, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने महिला पोलीस अधिकारी अश्विनी बिंद्रे हत्या प्रकरणी कायदेशीर बाजू मांडण्यासाठी ॲड. प्रदीप घरत यांची माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खटला लढण्यासाठी काही अटी व शर्तीवर शासनाने त्यांची नियुक्ती करुनही गत ९ महिन्यापासून उक्त सरकारी वकिलांना शासनाने मानधनाची रक्कम अदा केली नसल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत ९ महिन्यापासून प्रकरणाधीन सरकारी वकिलांचे मानधन अदा न करण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२६-०२-२०२१) :** (१) होय, प्रश्नाधीन प्रकरणी शासनाने ॲड. प्रदीप घरत यांची विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती केली होती.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी ॲड.प्रदीप घरत यांना द्यावयाच्या व्यावसायिक फीचे दर शासन निर्णय, गृह विभाग क्र.एसपीपी-०५१८/प्र.क्र.१७०/पोल-१०, दिनांक ०२/१२/२०१९ व शुध्दीपत्रक क्र.एसपीपी-०५१८/प्र.क्र.१७०/पोल-१०, दिनांक १७/०१/२०२० अन्वये निश्चित करण्यात आले आहेत. सदर फी अदा करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचे कार्यालयास अनुदान प्राप्त झाल्यानंतर, ॲड. श्री.घरत यांना माहे एप्रिल, जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर, २०१९ या मध्ये त्यांनी नमुद केलेल्या तारखेनुसार एकूण फी रुपये ४,२०,०००/- इतकी रक्कम दिनांक २२/१०/२०२० रोजी अदा करण्यात आलेली आहे.

---

## जात पडताळणी समितीतील अधिकारी यांना निलंबित करण्याबाबत

**(७) २९९६ (२८-०५-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे तत्कालीन उपायुक्त जलील शेख व बी.एन. वीर यांनी केलेल्या विविध गैरव्यवहार व नियमभंग प्रकरणांची मुद्देनिहाय चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे नोंदविण्यात यावेत अशी मागणी परभणी येथील लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, सामाजिक न्याय यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील निवेदनातील मुद्दयांची सविस्तर चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१५-०२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी शासनाने महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ मधील पोटनियम

२५ (४) नुसार चौकशी करण्यासाठी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांची दिनांक १३ मार्च, २०२० रोजीच्या पत्रान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने देखील चौकशी करण्याबाबत आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना दिनांक २२ जुलै, २०२० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत येणाऱ्या मोर्चा/आंदोलनाचे नियमन करण्यासाठी धोरण आखण्याबाबत

**(८) ३००९ (२९-०५-२०२०). श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या सर्व ठिकाणाहून मुंबईत मोर्च काढले जातात, यामुळे आधीच दिवसेंदिवस गुंतागुंतीची होणारी वाहतूक व्यवस्था या मोर्चामुळे प्रभावित होते, मुंबईचे जगजीवनही त्यामुळे विस्कळीत होते, याशिवाय मोर्चामध्ये दिल्या जाणाऱ्या घोषणेमुळे ध्वनी प्रदूषणही होते व हे मोर्चे काळा घोडा येथे जाऊन थांबत असतात, त्यामुळे मुंबईत धडकणाऱ्या मोर्चाचे नियमन करण्याची नितांत आवश्यकता असून त्यादृष्टीने आदेश द्यावेत, या मागणीसाठी 'नरीमन पाईट, चर्चगेट सिटीझन रेसिडेंट असोसिएशन' ओव्हल कूपरेज रेसिडेंटस् असोसिएशन, कुलाबा कप परेड सिटीझन असोसिएशन या संस्था आणि काही हॉटेल मालकांनी सन १९७७ मध्ये मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती या याचिकेची दखल घेत न्यायालयाने त्याचवर्षी तसेच, दिनांक २२ मार्च, २०२० रोजी मुंबईत येणाऱ्या मोर्चा/आंदोलनाचे नियमन करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोर्चा दरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना दंड आकारण्याच्या तरतुदीचाही या धोरणात समावेश करण्याचे तसेच हे धोरण अंमलात येईपर्यंत त्रिसदस्यीय समितीने मोर्चाचे नियम करण्याबाबत दिलेल्या निर्देशाचे पालन केले जाईल असे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती भूषण अधिकारी आणि न्यायमूर्ती नितीन बोरकर यांच्या खंडपीठाने नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने आंदोलनाच्या नियमासाठी धोरण आखण्यात आले आहे काय व आंदोलनाच्या नियमाच्या धोरणाचे स्वरूप काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (१९-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १२/०३/२०२० रोजीच्या आदेशान्वये मुंबई येथे येणाऱ्या मोर्चे, धरणे व आंदोलने याकरीता नियमन करुन अहवाल सादर करण्याबाबत आदेशित केले आहे.
(२), (३) व (४) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात लॉकडाऊनच्या काळात कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(९) ३०१७ (२९-०५-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना विषाणूंमुळे प्रादुर्भाव दिवसागणिक वाढत असल्याने, देशासह संपूर्ण राज्यात लॉकडाऊन सुरू असतानाही पश्चिम रेल्वेच्या वांद्रे रेल्वे स्थानकाजवळ परप्रांतिय मजुर एकत्र येऊन मदत नको, गावी जायचे आहे, अशी भूमिका घेत दिनांक १४ एप्रिल, २०२० रोजी केलेल्या आंदोलनात स्थानिक लोकांसह काही राजकीय पक्षाचे मा.लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते उपस्थित असल्याने त्यांनी जाणीवपूर्वक कायद्याचे उल्लंघन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात लॉकडाऊन सुरू असतानाही सुमारे १००० हून अधिक मजूरांसह अनेक स्थानिक तसेच काही राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते रस्त्यावर येत असताना, पोलीस प्रशासनाला या प्रकरणी कोणताही सुगावा न लागणे तसेच त्यांचा योग्य तो बंदोबस्त करण्यात अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लॉकडाऊनच्या काळात कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या सर्व संबंधितांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (१९-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे. तथापि, राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी तसेच कार्यकर्ते तेथे उपस्थित नव्हते.

(२) हे खरे नाही.

(३) (अ) कोविड-१९ या साथीच्या रोगाचे संक्रमण थांबविण्यासाठी भारत सरकारने तसेच राज्य शासनाने संचारबंदी, लॉकडाऊन यासंदर्भात वेळोवेळी आदेश जारी केलेले आहेत, हे माहित असतानाही, आरोपीत नामे विजय दुबे याने दिनांक १३/०४/२०२० रोजी ट्विटर तसेच फेसबुकच्या माध्यमातून गैरकायदेशीररित्या एकत्र जमाव जमविण्यासाठी चिथावणी दिल्यामुळे वांद्रे पोलीस ठाण्याच्या हद्दीत शास्त्रीनगर, कुरेशीनगर, महाराष्ट्र नगर, नर्गिस दत्त नगर या वसाहतीतील सुमारे १० ते १२ हजार कामगार मजदुर दिनांक १४/०४/२०२० रोजी १५.४५ वा. ते १७.१५ वा. दरम्यान वांद्रे रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेस मोकळया परिसरात गैरकायदेशीररित्या गोळा झाले. सबब शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशातील सूचनांचे पालन न केल्याबद्दल तसेच सदर ठिकाणी हजर असलेल्या गणवेशातील पोलीस अधिकारी करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला म्हणून वांद्रे पोलीस ठाणे येथे दिनांक १४/०४/२०२० रोजी गु.र.क्र.२९०/२०२० कलम १४३, १४७, १४९, १८६, १८८, २६९, २७०, ५०५(२) भा.दं.वि.स. कलम ३ साथीचे रोग अधिनियम १८९७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. त्यानुसार १० आरोपींना अटक करण्यात आली असून सद्य:स्थितीत हे आरोपी मा.न्यायालयाच्या आदेशान्वये जामिनावर मुक्त आहेत.

(ब) तसेच उपरोक्त गुन्ह्यांच्या अनुषंगाने विनय जटाशंकर दुबे यास दिनांक १५/०४/२०२० रोजी अटक केली असून त्याच्याविरुध्द कलम ११७, १८८, २७९, २७०, ५०५(२) भा.दं.वि.स. कलम ३ साथीचे रोग अधिनियम १८९७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पोलीस उपनिरीक्षक पदाच्या भरतीबाबत

**(१०) ३११४ (२९-०५-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विनायकराव मेटे, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने संकेत स्थळावर दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० रोजी प्रसिध्द झालेल्या जाहिरातीत धनगर समाजाला ३.५ टक्के आरक्षण असतानादेखील पोलीस उपनिरीक्षक गट-ब पदाच्या भरती प्रक्रियेत एन.टी.-क (धनगर) प्रवर्गाला केवळ दोन जागा दिल्यामुळे सदर जाहिरात रद्द करून आरक्षणानुसार जागा देऊन पुन्हा सुधारित जाहिरात प्रसिध्द करावी अशी मागणी धनगर प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या, ठाणे जिल्हा शाखेच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.नगर विकास मंत्री आदींकडे लेखी निवेदनाव्दारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीबाबात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार धनगर समाजाचे ३.५ टक्के आरक्षणानुसार सुधारित जाहिरात प्रसिध्द करून पोलीस उपनिरीक्षक भरती प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (१५-०२-२०२१) :** (१) होय.

(२) व (३) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १८/१०/१९९७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षण हे वर्गाच्या पदसंख्येस लावण्यात येत असून रिक्त होणाऱ्या जागेनुसार आरक्षण लावण्यात येत नाही.

पोलीस उपनिरीक्षक पदाच्या सेवाप्रवेश नियमातील विहित प्रमाणानुसार सरळसेवेने भरावयाच्या पोलीस उपनिरीक्षक पदांची संख्या ४९३० इतकी आहे. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाने निश्चित करून दिलेल्या प्रवर्गनिहाय आरक्षणाप्रमाणे भ.ज.(क) प्रवर्गासाठी एकूण ४९३० या संख्याबळाच्या ३.५% याप्रमाणे उपलब्ध झालेल्या १७३ पदांपैकी सन २०१७ पर्यंत १४० पदे भरलेली आहेत. सन २०१८ व २०१९ च्या परीक्षेव्दारे ३१ पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे उर्वरीत २ पदे सन २०२० च्या परीक्षेव्दारे भरण्यात येत आहेत.

---

## राज्यातील दुर्गम आदिवासी पाड्यांवरील विभक्त कुटुंबांना नवीन शिधापत्रिका देण्याबाबत

**(११) ३२११ (२८-०५-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ठाणे, पालघर, रायगड व नाशिक जिल्ह्यातील १८ हजार ८४८ आदिवासींची शिधापत्रिकाअभावी उपासमार होत असल्याने त्यांना तातडीने शिधापत्रिका मिळावी म्हणून श्रमजीवी संघटनेचे संस्थापक तथा राज्यस्तरीय अनुसूचित क्षेत्र आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित यांनी शासनाकडे मागणी करुनही त्यांना प्रतिसाद न मिळाल्यामुळे संघटनेने न्यायालयाकडे

मागणी केली असता, मा.उच्च न्यायालयाने दुर्गम आदिवासी पाड्यांवरील विभक्त झालेल्या कुटुंबांना अंत्योदय योजनेच्या लाभासहित नवीन शिधापत्रिका द्या असे आदेश माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाला दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या १६ आदिवासी संवेदनशील प्रकल्प विभागामध्ये अन्नधान्य व इतर अत्यावश्यक वस्तू उपलब्धता कमी असल्याने सदरहू गरिबांना अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तूसुध्दा देणार असल्याचे शासनाने मा.उच्च न्यायालयात दिलेल्या हमीपत्रात स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणांपैकी आजमितीस सुमारे १७ हजार ६९८ प्रकरणे प्रलंबित असून त्याप्रकरणी शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याने मा.उच्च न्यायालयाने तात्काळ शिधापत्रिका देण्याचे निर्देश शासनाला दिले असताना, शासनाने केवळ १ हजार १४८ शिधापत्रिका देऊन आदिवासी लोकांची फसवणूक केल्याचे आरोप करुन श्रमजीवी संघटनेने ठाणे, पालघर, रायगड आणि नाशिक जिल्ह्यातील सर्व तहसिलदार कार्यालयासमोर शिधापत्रिका हक्कासाठी दिनांक २६ मे, २०२० रोजीपासून बेमुदत आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरित आदिवासी कुटुंबांना शिधापत्रिका देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०२-०२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

जनहित याचिका क्र. LD-VC-१४/२०२० च्या अनुषंगाने सुनावणी होऊन दिनांक १५/०५/२०२० रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी शिधापत्रिकांसाठी प्राप्त झालेले अर्ज परिस्थिती सामान्य झाल्यावर नियमानुसार निकाली काढण्याबाबत आदेश दिले आहेत. सदर आदेशात दुर्गम आदिवासी पाड्यांवरील विभक्त झालेल्या कुटुंबांना अंत्योदय योजनेच्या लाभासहित नवीन शिधापत्रिका द्या, असे नमूद केलेले नाही.

(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, श्रमजीवी संघटनेमार्फत पालघर व नाशिक या जिल्ह्यांमध्ये आंदोलन करण्यात आले होते.
(४) शिधापत्रिकांसाठी प्राप्त अर्ज व त्यानुसार वितरीत करण्यात आलेल्या शिधापत्रिकांची जिल्हानिहाय आकडेवारी खालीलप्रमाणे :-

| जिल्हा | शिधापत्रिकांसाठी प्राप्त अर्जाची संख्या | वितरित करण्यात आलेल्या शिधापत्रिका |
|---|---|---|
| ठाणे | ३६४७ | ३६३० |
| पालघर | ९०५७ | ८७५४ |
| रायगड | ३३५ | ३३५ |
| नाशिक | १२६८७ | ७९१२ |

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात ट्रॉमा केअर सेंटरची बांधकामे पूर्ण करण्याबाबत

**(१२) ३६१५ (०२-०६-२०२०). श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २१०३ ला दिनांक ३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाने रूग्णालये, आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अपघातग्रस्तांना वैद्यकीय उपचार मिळावे यासाठी ट्रॉमा केअर सेंटरची बांधण्यात आलेली बांधकामे अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपूर्णावस्थेत असलेल्या आरोग्य केंद्रांचे, रूग्णालयांचे बांधकाम पूर्ण करण्याची व त्यामध्ये चांगल्या दर्जाच्या वैद्यकीय उपकरणांची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील नागरिकांना चांगली वैद्यकीय सेवा देण्यासाठी अर्धवट अवस्थेत असलेले बांधकाम पूर्ण करुन आवश्यक ती वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२४-०२-२०२१)** : (१) हे अंशत खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) राज्यात एकूण १०९ ट्रॉमा केअर सेंटर मंजूर असून त्यापैकी ६२ ट्रॉमा केअर सेंटरचे बांधकाम पूर्ण झालेले आहे, १९ ट्रॉमा केअर सेंटरचे बांधकाम सुरू आहे व उर्वरीत २८ ट्रॉमा केअर सेंटरचे बांधकाम सुरू करण्यासाठीची कार्यवाही सुरू आहे. राज्यात सद्य:स्थितीत ६० ट्रॉमा केअर युनिट कार्यान्वित आहेत. राज्यातील अर्धवट असलेल्या संस्थाच्या इमारत बांधकामासाठी उपलब्धतेनुसार निधी मंजूर करण्यात येत असून त्यानुसार बांधकाम सा.बां. विभागाकडून पूर्ण करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच वैद्यकिय उपकरणाची आवश्यकतेनुसार खरेदी करण्याकरीता हाफकिन मंडळामार्फत कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१३) ३९९९ (१७-०७-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर** : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोनाच्या महामारीमुळे अनेक मजुर, कामगार, कष्टकरी लोक भितीने आपल्या गावा-खेड्यात परतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा परिस्थितीमुळे अनेक मजुर कामगार व कष्टकरी लोकांचे रोजगार धोक्यात आले असून बेरोजगारीचे प्रमाण भविष्यात वाढणार असल्याचा धोका संभवत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर परिस्थितीचा धोका लक्षात घेता गाव पातळीवर लघु उद्योग उभे करून बेरोजगारांना स्थानिक पातळीवर रोजगार निर्माण करण्यासंदर्भात कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२५-०२-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) कोविड-१९ च्या जागतिक महामारीमुळे फेजप्रमाणे जाहीर लॉकडाऊनच्या काळात प्रथम टप्प्यात अत्यावश्यक सेवा वगळता इतर उद्योगांना व्यवसाय बंद ठेवावे लागले. सेवा पुरवठा साखळी खंडीत झाल्याने उद्योग, व्यवसाय क्षेत्रात अडचणी निर्माण होऊन काही क्षेत्रातील रोजगार कमी झाल्याने बेरोजगारांचे प्रमाण वाढल्याची शक्यता आहे. तथापि, कालानुरुप उद्योग, व्यवसाय क्षेत्रे नवीन पध्दतीने कामकाज नियोजन करीत असल्याने विविध क्षेत्रात रोजगार व स्वयंरोजगार संधी खुली होत आहेत.
(३) उपरोक्त परिस्थितीचा विचार करुन शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सहकार्याने महाजॉब्स हे ऑनलाईन पोर्टल विकसित केले असून रोजगाराकरीता इच्छुक असणाऱ्या उमेदवारांना औद्योगिक आस्थापनात उपलब्ध रोजगार संधी सुलभतेने प्राप्त होणेसाठी ऑनलाईन प्रणाली (महाजॉब्स पोर्टल) विकसित केले असून त्यास मोठा प्रतिसाद लाभत आहे. ज्या उद्योग घटकांना मनुष्यबळाची आवश्यकता आहे त्यांची नोंदणी पोर्टलवर करुन उद्योग व रोजगार इच्छुक उमेदवार या दोन्हींमध्ये समन्वय घडवून आणण्यात येत आहे. अद्यापपर्यंत सुमारे २००० हुन अधिक उद्योग घटकांनी व २५१००० रोजगार इच्छुकांनी पोर्टलवर नोंदणी केली आहे.

राज्य शासनाने होतकरु युवक-युवतींकरीता स्वयंरोजगाराची प्रेरणा मिळून अधिकाधिक रोजगार स्थानिक ठिकाणी उपलब्ध होणेसाठी सर्वसमावेशक अशी महत्वाकांक्षी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना सन २०१९ (ऑगस्ट) मध्ये जाहीर केली असून योजनेंतर्गत सुमारे ५०,००० युवक युवतींनी स्वयंरोजगार प्रस्ताव सादर केले असून सन २०२०-२०२१

अंतर्गत एकूण १५,००० स्वयंरोजगार प्रकल्प प्रस्ताव उभारणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यापैकी ३५०० प्रकल्पांचे प्रस्ताव बँकांनी मंजूर केलेले आहेत. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेतून साधारणत: १ ते १.५ लाख रोजगाराच्या संधी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष प्रतिवर्षी निर्माण होतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे येथील कावेसर भागात राहणाऱ्या अभियंत्याला मारहाण झाल्याबाबत

**(१४) ४१९३ (१६-०७-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील कावेसर भागात राहणाऱ्या अनंत करमुसे या अभियंत्याला फेसबुकवर पोस्ट टाकल्याचा जाब विचारत मा.गृहनिर्माण मंत्री यांचे बंगल्याच्या आवारात मारहाण करण्यात आल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मारहाण प्रकरणांमध्ये मुंबई पोलीस दलातील ३ पोलिसांचाही सहभाग असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२४-०२-२०२१) :** (१) सदर गुन्हयाच्या अद्यापपर्यंत केलेल्या तपासामध्ये सुरक्षा गार्ड यांच्याकडे केलेला तपास, तपासण्यात आलेले इतर साक्षीदार, उपलब्ध सी.सी.टी.व्ही.फुटेज यावरुन गृहनिर्माण मंत्री यांच्या समक्ष मारहाण झाल्याबाबत तपासामध्ये निष्पन्न झालेले नाही.
(२) व (३) सदर फिर्याद नोंदविताना पोलिसांनी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणात ३ पोलीस

अंमलदार व इतर ७ आरोपींना अटक करुन त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दिनांक ०७/१२/२०२० रोजी दोषारोपपत्र सादर केलेले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पोलीस उप अधीक्षक यांची वेतनवाढ सेवाकालावधीनुसार करण्याबाबत

**(१५) ४३९५ (३१-०७-२०२०). श्री.किशोर दराडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरळसेवा पोलीस उप अधीक्षक यांची निवड महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या राज्य सेवा या एकाच स्पर्धा परीक्षेव्दारे उपजिल्हाधिकारी, सहाय्यक विक्रीकर आयुक्त व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याबरोबर एकाच वेतनश्रेणीत होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर खात्यातील अधिकारी यांच्या पगारामध्ये त्यांच्या सेवाकालानुसार वाढ होते, परंतु पोलीस उप अधीक्षक यांच्या वेतनामध्ये त्याप्रमाणे वाढ होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इतर राज्यातील गोवा, पंजाब, मध्य प्रदेश येथील पोलीस उप अधीक्षक यांची वेतनवाढ ही भारतीय पोलीस सेवेतील प्रवेशावर नाही तर त्यांच्या सेवाकालावधीवर अवलंबून आहे, याउलट महाराष्ट्र पोलीस उप अधीक्षक यांची वेतनवाढ ही त्यांच्या सेवा कालावधीवर नाही तर भारतीय पोलीस सेवेतील प्रवेशावर अवलंबून आहे, त्यामुळे महाराष्ट्र राज्य पोलीस उप अधीक्षक या पदाकरीता दिली जाणारी वेतनश्रेणी ही इतर अधिकारी वर्गापेक्षा अत्यंत तुटपुंजी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील सरळसेवा पोलीस उप अधीक्षक यांची वेतनवाढ इतर राज्याप्रमाणे सेवाकालावधीनुसार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२२-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) राज्य पोलीस सेवेतील पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) (सातव्या वेतन आयोगानुसार एस-२० रुपये ५६,००० - रुपये १,७७,५००) या संवर्गातील अधिकाऱ्यांना सेवाप्रवेश नियमानुसार पोलीस अधीक्षक/पोलीस उप आयुक्त (असंवर्ग) (सातव्या वेतन आयोगानुसार एस-२३ रुपये ६७,७०० - रुपये २,०८,७००) या पदावर पदोन्नती देण्यात येते. पदोन्नतीनंतर पदोन्नतीप्रमाणे पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) यांची पोलीस अधीक्षक (असंवर्ग) या पदावर वेतननिश्चिती होते.

पोलीस अधीक्षक/पोलीस उप आयुक्त (असंवर्ग) या संवर्गात पदोन्नती झाल्यानंतर त्यांचे भारतीय पोलीस सेवेत (IPS) नामनिर्देशन होईपर्यंत एकाच वेतनश्रेणीत कार्यरत असतात. त्यामुळे राज्यातील महसूल अधिकारी, वित्त विभागाचे विक्राकर अधिकारी आणि अन्य राज्यातील पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या धर्तीवर राज्य पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांना सेवाकालावधीनुसार वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. राज्य पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणीबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाची/निवेदनाची माहिती राज्य वेतन सुधारणा समिती-२०१७ ला देण्याकरीता https://mahaseventhpay.in या ऑनलाईन वेब पोर्टलवर सादर केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-ठाणे एसटी विभागातील कर्मचाऱ्यांना संपूर्ण वेतन अदा करण्याबाबत

**(१६) ४५६६ (१७-०७-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-ठाण्यात अडकलेल्या हजारो मजुरांना मध्य प्रदेश सीमेपर्यंत सोडणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांकडे शासनाने दुर्लक्ष केले असून मुंबई-ठाणे विभागात कार्यरत एसटी कर्मचाऱ्यांना माहे मे, २०२० चे वेतन अदा करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाच्या संकटकाळात एसटी कर्मचाऱ्यांना आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई-ठाणे एसटी विभागातील कर्मचाऱ्यांना संपूर्ण वेतन अदा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२२-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांचे माहे नोव्हेंबर, २०२० पर्यंतचे संपूर्ण वेतन अदा करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील मका पिकांवरील अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत

**(१७) ४५८३ (१६-०७-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत, जामखेड, श्रीगोंदा, श्रीरामपूर, कोपरगाव, नेवासा (जि.अहमदनगर) भागात मका पिकांचे क्षेत्र आहे, खरीप हंगामात मका पिकाचे सरासरी क्षेत्र ५३ हजार ५७१ असून माहे जून, २०२० पर्यंत ३० हजार हेक्टर क्षेत्रावर मका पिकाची पेरणी झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावर्षी पाऊस लवकर झाल्याने मक्याची पेरणी झाली असून सर्वसाधारण फूटभर उंच वाढलेल्या मका पिकावर अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे जून, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पिकांवरील अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या नेमक्या उपाययोजना व मार्गदर्शन मिळत नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मका पिकांवरील अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शेतकऱ्यांना उपाययोजना व मार्गदर्शन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२२-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

अहमदनगर जिल्ह्याचे मका पिकाचे सरासरी क्षेत्र ३२५७०.४३ हेक्टर असून माहे जून, २०२० अखेर प्रत्यक्षात ३८७३६ हेक्टर पेरणी झालेली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

माहे जून, २०२० मध्ये अल्प प्रमाणात मका पिकावरील नविन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसुन आला.
(३) हे खरे नाही.
(४) मका पिकावरील नविन लष्करी अळी नियंत्रणासाठी ग्रामस्तरावर खरीप हंगामामध्ये मका पिकाच्या ४० शेतीशाळा राबविणेत आलेल्या असून शेतीशाळांव्दारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले असून प्रत्यक्ष भेटीव्दारे ग्रामपंचायतस्थित वार्ताफलकव्दारे तसेच एम-किसान पोर्टलवरुन भ्रमणध्वनीव्दारे संदेश देऊन तसेच विविध माध्यमाव्दारे जनजागृती करण्यात आलेली आहे.

सर्वेक्षणासाठी योजनेंतर्गत २७५ हेक्टर वर १३७२ फेरोमन ट्रॅप्स व ४११६ एफएडब्लु लुर्स चा वापर करणेत आलेला आहे.

किड नियंत्रणासाठी ५० टक्के अनुदानावर १००० हेक्टर क्षेत्रासाठी प्रोफेनोफॉस २५० लि. व इमामेक्टीन बेंझोएट २०० कि. किटकनाशकांचा पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच प्रचार प्रसिध्दीसाठी २०००० घडीपत्रिकांचे वितरण करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील शहरप्रमुखांवर कारवाई करण्याबाबत

**(१८) ४६९६ (१८-०८-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहराचे शहरप्रमुख मंगेश कडव यांनी पदाचा दुरुपयोग तसेच नागरिकांची फसवणूक करुन लाखोंचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी त्यांचेवर सन २००३ पासून गुन्हेगारी व फसवेगिरी या गुन्ह्यांची नोंद होऊनही त्यांचेवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरातील सर्वच पोलीस स्टेशनमध्ये श्री.कडव यांचेवर १२ पेक्षा अधिक गुन्हयाची नोंद असताना पोलीस प्रशासनामार्फत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर शहरात नागरिकांची फसवणूक करुन गैरव्यवहार करणाऱ्या गुन्हेगारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२६-०२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

मंगेश कडव विरुध्द सर्व तक्रारीची दखल घेऊन गुन्हे दाखल करण्यात आले आहे. माहे जून-जुलै, २०२० या कालावधीत फसवणूक, खंडणी सदराखाली १० गुन्हे दाखल करण्यात आले असून ९ गुन्ह्यात आरोपीला अटक करण्यात आलेली आहे. एका गुन्ह्यात प्रोडक्शन वारंट मिळालेला असून यापैकी ८ गुन्ह्यात दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल आहे व १ गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) आरोपी मंगेश कडव विरुध्द गुन्हेशाखा (डिटेक्शन) नागपूर शहर कार्यालयामार्फत खंडणी विराधी पथकाचे अधिकारी दाखल गुन्ह्याचा तपास करीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(१९) ४७४५ (१३-०८-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोरोना महामारीच्या पार्श्वभुमीवरील अनलॉकचा दुसरा टप्पा सुरू झाला परंतु लॉकडाऊन दरम्यान जिल्हांतर्गत एसटीची सेवा बंद असल्याने चार महिने झाले तरीही एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन थकित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले असून थकित वेतनामुळे अनेक कर्मचाऱ्यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जुलैच्या शेवटच्या आठवड्यात सांगली जिल्हयातील इस्लामपूर आगारातील मेकॅनिकल अमोल माळी यांना दोन महिन्याचे वेतन न मिळाल्याने त्यांच्या कुटुंबावर आलेल्या आर्थिक संकटाला कंटाळून त्यांनी पेठे येथील स्वत:च्या राहत्या घरी आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमोल माळी यांच्या वेतनावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरु असल्याने त्यांच्या निधनाने कुटुंबावर आलेले आर्थिक संकट दूर करण्यासाठी शासनाने उपाययोजना केली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अमोल माळी यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे, राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन वेळेत अदा करणे व एस.टी. कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२२-०२-२०२१) :** (१) कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर परिणाम झाल्याने कर्मचाऱ्यांचे माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर, २०२० या महिन्यांचे वेतन थकलेले होते. तरी, सदर वेतन अदा करण्यात आले आहे.

(२) सदर कर्मचाऱ्याने आत्महत्या केली आहे तथापि, आत्महत्येच्या कारणाचा तपास पोलीस विभागाकडून करण्यात येत आहे.

(३) व (४) दिवंगत कर्मचारी कै.अमोल माळी यांच्या अंत्यविधीसाठी तातडीची मदत म्हणून रुपये ५०००/-, तसेच भविष्य निर्वाह निधी उपदान या अंतिम देयकाची रुपये ९,५४,९९२/- एवढी रक्कम दिनांक २९/०९/२०२० रोजी त्यांच्या वारसास अदा करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत कुटुंब कल्याण योजनेंतर्गतच्या एक लाख रुपयांच्या मागणीचा अर्ज महामंडळाव्दारे मंजूर करण्यात आला असून, पुढील कार्यवाही चालू आहे व अनुकंपा तत्वावरील नोकरी संदर्भात त्यांच्या वारसास कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथील श्री तुळजाभवानी देवीच्या मौल्यवान वस्तूंचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२०) ४८४९ (२०-११-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथील महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीचा प्राचीन खजिना व जामदार खान्यातील ऐतिहासिक व मौल्यवान अलंकार, सोन्या-चांदीचे दागिने, जडजवाहीर व प्राचीन नाणी इत्यादी मौल्यवान वस्तूंचा तत्कालीन अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मंदिर प्रशासन व जिल्हा प्रशासनाकडे तक्रार करण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार उक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (१९-०२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) तुळजाभवानी मंदिर पुजारी मंडळाचे माजी अध्यक्ष श्री.किशोर कल्याणराव गंगणे यांनी दिनांक ०९/०५/२०१९ रोजी या संदर्भात जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे तक्रारी अर्ज केला असून तत्कालीन जिल्हाधिकारी श्रीमती दिपा मुधोळ-मुंढे यांनी यासंदर्भात अपर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत केली आहे.

सदर समिती मार्फतीने चौकशी करुन चौकशी अहवाल जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना सादर केला असून सदर अहवालाचे अवलोकन करुन जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी दिनांक १०/०९/२०२० रोजी श्रीमती योगिता सहदेव कोल्हे तहसिलदार तथा व्यवस्थापक प्रशासन यांना गुन्हा दाखल करण्यासाठी प्राधिकृत केले होते.

तहसिलदार श्रीमती योगिता सहदेव कोल्हे यांनी श्री.दिलीप देविदासराव नाईकवाडी यांनी धार्मिक व्यवस्थापक या पदी कार्यरत असताना त्यांचे पदाचा दुरुपयोग करुन श्री.तुळजाभवानी देवीजींचे खजाना व जमादारखान्यातील अति प्राचीन व ऐतिहासिक अलंकार, वस्तू तसेच भाविकांनी अर्पण केलेले सोने व नाणी याची वैयक्तिक स्वार्थासाठी अप्रामाणिक अपहार/चोरी केली बाबतची फिर्याद दिनांक १३/०९/२०२० रोजी पोलीस ठाणे, तुळजापूर येथे चौकशी अहवालाचे कागदपत्रासह दिली.

यानुसार पोलीस ठाणे तुळजापूर गु.र.नं. ३२३/२०२० कलम ४२०, ४०९, ४६४, ४६७, ४६८, ४७१, ३८१ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग तुळजापूर हे करीत आहेत.

(४) चौकशी अहवालावरुन गुन्हा दाखल केल्याने विलंब झालेला आहे.

---

## राज्यात पोलिसांवरील हल्ल्याच्या घटना घडल्याबाबत

**(२१) ४८७१ (१८-११-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना संसर्ग रोखण्यासाठी लावण्यात आलेल्या ताळेबंदी दरम्यान राज्यातील औरंगाबाद, भिवंडी, मुंब्रा, मालेगाव, गोवंडी अशा काही विशिष्ट भागात पोलिसांना मारहाणीच्या व जीवघेणे हल्ले करण्याच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले असून सदरचे हल्ले रोखण्याबाबत व हल्लेखोरांवर कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १ मे, २०२० रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील काळबादेवी परिसरात कॉटन एक्सचेंज नाका येथे एका महिलेने वाहतूक पोलिसाची कॉलर पकडून कानशिलात मारल्याची घटना घडली तसेच अंबरनाथ (जि.ठाणे) येथे पोलिसांवर हल्ला झाल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले असून माहे मार्च, २०२० पासून आतापर्यंत ३७८ ठिकाणी पोलिसांवर हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलिसांवरील हल्ल्यांमध्ये किती पोलीस जखमी झाले आहेत व किती पोलिसांना आपला जीव गमवावा लागला आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोलिसांना मारहाण व जीवघेणा हल्ला करणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन जखमी पोलिसांना व मृत पोलिसांच्या कुटुंबियांना आर्थिक व वैद्यकीय मदत आणि विम्याची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (१९-०२-२०२१) :** (१) सदर प्रकरणी कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे.
(२), (३) व (४) कॉटन एक्सचेंज, मुंबई येथे एका महिलेवर वाहतूक नियमाचा भंग केल्याप्रकरणी पोलीस अंमलदार हे कारवाई करीत असताना सदर महिलेने त्यांना शिवीगाळ केली व शासकीय कर्तव्यात अडथळा निर्माण केला म्हणून लोकमान्य टिळक मार्ग पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.५७१/२०२० कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६, ३४ भा.दं.वि. सह कलम १२९, १७७ मो.वा. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

तसेच अंबरनाथ (जि.ठाणे) येथे पोलिसांवर हल्ला करुन व त्यांना जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्यावरुन अंबरनाथ पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५६७/२०२० भादंवि कलम ३०७, ३९२, ३५३, ३३२, ३३३, ४२७, ३४ सह आर्म अॅक्ट ४, २५ प्रमाणे ४ आरोपितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे.

मार्च, २०२० पासून कोरोना संसर्ग रोखण्यासाठी लॉकडाऊन व कोविड-१९ मिशन बिगन अगेनच्या कालावधीत राज्यात एकूण ३९० पोलिसांवर हल्ले झाले असून सदर हल्ल्यामध्ये एकूण ९० पोलीस जखमी झालेले आहेत. पोलिसांना मारहाण व जीवघेणा हल्ला करणाऱ्यांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर गुन्ह्यांत एकूण ९१२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

जखमी पोलिसांना संबंधित घटक कार्यालयाकडून तात्काळ वैद्यकिय मदत देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एसटी महामंडळाच्या प्रवाशांचा कल खाजगी वाहनांकडे वाढल्याबाबत

**(२२) ४९०९ (२५-११-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटी महामंडळामार्फत प्रवाशांना योग्य त्या सोयी सुविधा पुरविण्यात येत नसल्याने प्रवाशांचा खाजगी वाहतूकदारांकडे कल वाढला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी वाहतूकदारांकडे होणारा प्रवाशांचा कल कमी करण्यासाठी महामंडळ प्रशासनातर्फे पोलीस प्रशासनाला सुरक्षेव्यवस्थेकरीता प्रस्ताव देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यासाठी एस.टी. महामंडळाकडे पैसे शिल्लक नाहीत व त्यामध्ये खाजगी वाहनाचे दलाल प्रवाशांना स्वत:कडे वळवित असल्यामुळे एस.टी. महामंडळ आणखी अडचणीत येण्याची शक्यता असताना शासनाव्दारे कुठल्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार एस.टी. कर्मचाऱ्यांसमोर सदरहू प्रकार सुरू असून दलालांकडे होत असलेल्या दुर्लक्षाबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२२-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) राज्य परिवहन बसस्थानकावर सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली असून, बस स्थानकात खाजगी एजंट प्रवासी घेऊन जात असल्याचे निदर्शनास आल्यास कामगिरीवरील सुरक्षा रक्षकांनी त्यास प्रतिबंध करून संबंधित खाजगी एजंटला पकडून स्थानकप्रमुख/आगार प्रमुख यांच्या ताब्यात देवून पोलिसांत तक्रार देण्याची कार्यवाही करण्यात येते. तसेच, गृह (परिवहन) विभागाच्या दिनांक १४/०१/२०१६ च्या शासन परिपत्रकांन्वये राज्य परिवहन बस स्थानकाच्या परिसरात अवैद्य प्रवासी वाहतूक करणाऱ्या खाजगी वाहतूकदारांना प्रतिबंध करुन उचित कायदेशिर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ज्येष्ठ लेखिका श्रीमती शोभा देशपांडे यांनी आंदोलन केल्याबाबत

**(२३) ४९२५ (२३-१२-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुलाबा, मुंबई येथील 'महावीर ज्वेलर्स' या सराफा दुकानदाराला मराठी भाषेत बोलण्याचा आग्रह केल्यानंतर संबंधित दुकानदाराने अरेरावी व अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप करीत ज्येष्ठ लेखिका श्रीमती शोभा देशपांडे यांनी या दुकानासमोर दिनांक ८ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास रात्रभर अन्नत्याग करून ठिय्या आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात मराठी भाषेचा वापर होण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२३-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, यासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त माहितीनुसार पोलीस ठाणेमार्फत केलेल्या कार्यवाही दरम्यान संबंधित महिलेचा जबाब नोंदवला असता त्यांनी नमूद दुकानदार यांनी झालेल्या प्रकाराबद्दल माफी मागितलेली असल्याने श्रीमती शोभा देशपांडे यांचे समाधान झाले आहे.

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ मधील तरतूदींच्या अनुषंगाने शासन व्यवहारात मराठी भाषेचा वापर करण्यासंदर्भात दिनांक ०७/०५/२०१८ व दिनांक २९/०६/२०२० च्या परिपत्रकान्वये सर्व शासकीय कार्यालयांना विभागामार्फत वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरासह ठाणे, पनवेल व रायगड येथील वीज पुरवठा खंडित झाल्याबाबत

**(२४) ४९९५ (२३-११-२०२०). श्री.प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.रामनिवास सिंह, श्री.महादेव जानकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशाची आर्थिक राजधानी व आंतरराष्ट्रीय शहर असलेल्या मुंबई शहरासह ठाणे, पनवेल व रायगड येथे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अचानक वीज पुरवठा पूर्णपणे खंडित झाल्यामुळे जनजीवन विस्कळीत होऊन रेल्वेसह रस्ते

वाहतूक, दैनंदिन व्यवहार, इंटरनेट सेवा संपूर्णपणे बंद होवून कित्येक रुग्णालयात शस्त्रक्रिया पुढे ढकलण्यात आल्यामुळे कोटयवधी रूपयांचे नुकसान होऊन नागरिकांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण राज्याला जेवढी वीज दररोज लागते त्याच्या सुमारे १५ ते १७ टक्के वीज एकटया मुंबईला हवी असते व संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्राचा (एमएमआर) विचार केल्यास राज्याच्या २२ ते २५ टक्के विजेची मागणी मुंबईमधून असल्यामुळे उक्त ठिकाणी राज्यभार वितरण केंद्रे परिस्थिती योग्यवेळी हाताळू शकले नसल्यामुळे भार येऊन संपूर्ण वीज ग्रीड कोसळण्यास वीज पारेषण व वीज वितरण कंपन्याचा बेजबाबदारपणा कारणीभूत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी सन २०१० मध्ये मुंबई शहरातील वीज पुरवठा खंडित होण्याची घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन शासनाने श्री.अजोय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने काही शिफारसी शासनास सादर केल्या होत्या तसेच महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने (एमईआरसी) स्वत:हून दखल घेत आयआयटी पवईतील प्राध्यापक एस.ए.खोपर्डे यांच्या विशेष समितीने सन २०१०-२०११ मध्ये आपल्या अहवालात महत्वपूर्ण शिफारसी शासनाला केल्या होत्या परंतु गत ९ वर्षात उक्त शिफारशींनुसार कार्यवाही न झाल्याने मुंबई शहराला पुन्हा वीज पुरवठा खंडित होण्याच्या नामुष्कीचा सामना करावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ठिकाणी वीज पुरवठा खंडीत होण्यामागे घातपाताची शक्यता असल्याचे मा.ऊर्जा मंत्री यांनी संशय व्यक्त केल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतचा तपशिल काय आहे तसेच भविष्यात पुन्हा अशी घटना घडू नये याकरीता कोणती खबरदारी अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२८-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

मुंबई महानगर क्षेत्रात दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी १०.०२ वाजता ग्रीडमध्ये बिघाड झाल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला होता. प्राधान्याने आपत्कालीन सेवा, कोविड-१९ रुग्णालये, रेल्वे इत्यादींचा वीज पुरवठा तातडीने सुरु करण्यात आला.

(२) महाराष्ट्राची सर्वोच्च विजेची मागणी सुमारे २४,००० मेगावॅट असून, मुंबई महानगर क्षेत्राची विजेची मागणी सुमारे ४,००० मेगावॅट आहे. सदर घटनेची चौकशी करण्याकरीता केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA), राज्य शासन व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्यामार्फत समित्या गठित करण्यात आल्या आहेत.

(३) दिनांक १८ व २१ नोव्हेंबर, २०१० रोजी मुंबई पारेषण प्रणालीच्या आंशिक ग्रीड बिघाडाबाबत गठित करण्यात आलेल्या समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने लघुकालीन योजनेंतर्गत तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यात आली असून दिर्घकालीन उपाययोजनेंतर्गत ४०० के.व्ही. विक्रोळी वाहिनीचे व उपकेंद्राचे काम करण्याबाबत संबंधित कंत्राटदारास जून, २०२० मध्ये कार्यादेश देण्यात आले असून सदर काम मार्च, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. तसेच मुंबई शहरास विद्युत पुरवठा करणाऱ्या २२० के.व्ही. वाहिन्यांचे कंडक्टर्स बदलून त्यांची क्षमतावृध्दी करण्यात आली आहे.

तसेच श्री.खापर्डे यांच्या अहवालातील शिफारशींवर महापारेषणतर्फे कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) सदर घटनेची चौकशी करण्याकरीता केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA), राज्य शासन व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्यामार्फत चौकशी समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. सदर समित्यांचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या शिफारशी व राज्य शासनाने गठित केलेल्या समितीच्या शिफारशींचा एकत्रितपणे अभ्यास करण्यात येईल. सदर घटनेनंतर मा.मंत्री (ऊर्जा) यांनी राज्यभार प्रेषण केंद्र, कळवा तसेच टाटा, अदानी यांच्या कंट्रोल रुम्सला भेट देवून तेथील यंत्रणेची पाहणी केली व काळानुरुप त्यामध्ये

सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच मुंबई आयलॅन्डीग ऑपरेट होण्यापूर्वी भारनियमन करण्याची फ्रिक्वेन्सी लिमिट ४८ हर्टझ वरुन ४८.४ हर्टझने वाढविली. त्यानुसार मुंबईतील सर्व वीज वितरण कंपन्यांना फ्रिक्वेन्सी सेटिंग्जच्या सूचना देण्यात आल्या.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रमाबाई आंबेडकर घरकुल योजनेच्या धर्तीवर नवीन योजना तयार करण्याबाबत

**(२५) ४९९९ (१४-१२-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागास वर्गातील (ओ.बी.सी) दिव्यांग, तसेच विधवा महिलांना हक्काचे घर देण्यासाठी रमाबाई आंबेडकर घरकुल योजनेच्या धर्तीवर नवीन योजना तयार करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे आणि प्रस्तावाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२७-०१-२०२१) :** (१) नाही.

तथापि, शासन निर्णय, दिनांक ११/०१/२०२१ अन्वये विमुक्त जाती भटक्या जमाती या प्रवर्गासाठी सुरू असलेल्या यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत लाभार्थी निवड करतांना विधवा/विधुर/अपंग/अनाथ/ परितक्त्या/वयोवृध्द या व्यक्तींचा प्राधान्याने समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरातील खाजगी मालक/विकासकांनी पुनर्विकास प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(२६) ५००५ (१४-१२-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील खाजगी मालक/विकासकांनी अपूर्णावस्थेत सोडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांची मालमत्ता संपादित करून प्रकल्प पूर्ण करण्यासाठी म्हाडा अधिनियमात सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सुधारणेचे थोडक्यात स्वरूप काय आहे आणि त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२४-०२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मुंबई शहरातील जीर्ण व धोकादायक उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलदगतीने होण्याकरीता मालक/विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडलेले पुनर्विकास प्रकल्प म्हाडातर्फे भूसंपादन करुन पूर्ण करण्याकरीता म्हाड अधिनियम, १९७६ मध्ये सुधारणा करण्याबाबतच्या विधेयकास पावसाळी अधिवेशन २०२० मध्ये सभागृहाची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर विधेयकास मा.राज्यपाल महोदयांची मान्यता प्राप्त झाली असून, महामहिम राष्ट्रपती महोदयांकडे पुढील मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहे. म्हाड अधिनियमात सुधारणा अंतिम झाल्यानंतर मालक/विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडलेले प्रकल्प म्हाडातर्फे ताब्यात घेऊन त्यांचा पुनर्विकास करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## 'व्हिजन ग्रीन' कंपनीने गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(२७) ५०६१ (१८-११-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'व्हिजन ग्रीन' कंपनीने मल्टिलेव्हल मार्केटिंग ड्रीम प्लॅनची स्वप्ने दाखवून, गुंतवणूकदारांना आर्थिक फायदा मिळण्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची सुमारे रुपये ८४ लाख ५६ हजार २०० ची फसवणूक केल्याच्या तक्रारी कोल्हापूर जिल्हयातील शाहुपुरी पोलीस प्रशासनाकडे दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'व्हिजन ग्रीन' कंपनीच्या सूत्रधारांनी लोकांची लाखो रुपयांची फसवणूक करून कंपनीचे सर्व सूत्रधार पसार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या 'व्हिजन ग्रीन' कंपनीवर कारवाई करुन गुंतवणूकदारांचे पैसे त्यांना परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (१९-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) सदर प्रकरणात एकूण ५ आरोपी निष्पन्न झाले असून यातील तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. एका आरोपीला मा.न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे व एक आरोपी फरार आहे. त्याचा शोध घेणे सुरु आहे.

(३) सदर प्रकरणी शाहुपुरी पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे गु.र.नं. ६२४/२०२० भा.दं.वि.स. कलम ४२०, ४०६, ४०८, ४०९, ३४ सह एम.पी.आय.डी. कायदा कलम ३ व ४ प्रमाणे एकूण ५ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकूण निष्पन्न ५ आरोपींपैकी ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे व १ आरोपीला मा.उच्च न्यायालयाने अटकपुर्व जामीन मंजूर केला आहे. १ आरोपी फरार आहे. अटक आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

आरोपींची स्थावर मालमत्तेची माहिती प्राप्त करणेसाठी संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## प्राथमिक शिक्षकांना कार्यमुक्त करण्याबाबत

**(२८) ५१४८ (१८-११-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोविड-१९ च्या काळात कामावर कार्यरत असलेल्या प्राथमिक शिक्षकांना कार्यमुक्त करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना दिनांक १७ ऑगस्ट, २०२० रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सेवेवर असणाऱ्या प्राथमिक शिक्षकांना कार्यमुक्त करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक १२/०८/२०२० रोजी माध्यमिक शाळेतील वर्ग सुरू होणार असल्याची शक्यता वर्तविली जात असताना नवी मुंबई महानगरपालिका व खाजगी अनुदानित शाळेतील इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतच्या शिक्षकांना कार्यमुक्त करण्यात आलेले आहे.

प्राथमिक शाळेतील शिक्षकांना कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत गेल्यानंतर टप्प्या-टप्प्याने माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये कोविड-१९ च्या जबाबदारीतून कार्यमुक्त करण्यात आले असल्याचे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाजॉब्स पोर्टलवर नोंदणी झालेल्या युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत

**(२९) ५१५८ (१२-११-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनेक परप्रांतिय कामगार कोरोनामुळे त्यांच्या राज्यात निघून गेल्यावर 'महाजॉब्स' पोर्टलचे उद्घाटन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते दिनांक ६ जुलै, २०२० रोजी करण्यात आले असून भूमिपुत्रांना रोजगार देण्याचे काम सदरहू पोर्टलमार्फत केले जाईल असे शासनाने आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाने लॉकडाऊनच्या काळात प्रत्येक जिल्ह्यात आयोजित केलेले ऑनलाईन मेळावे तसेच महास्वयंम वेब पोर्टलमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांच्या आधारे एकूण ५३ हजार ४१ इतक्या बेरोजगारांना रोजगार मिळवून दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाजॉब्स पोर्टलवर आजपर्यंत २ लाख ७० हजार युवकांनी नोंदणी केली असून प्रत्यक्षात मात्र ५०० तरुणांना रोजगार मिळाल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदन देऊन शासनाने याबाबत आपली भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीनुसार उर्वरित नोंदणी झालेल्या युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत तसेच शासनाने प्रसिध्द केलेल्या ५३ हजार ४१ इतक्या उमेदवारांचे नाव, पद व कंपनीसह माहिती देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.प. ७ (३९)

**श्री.सुभाष देसाई (२४-०२-२०२१) :** (१) होय.

(२) लागू नाही.

(३) पोर्टलवर २ लाख ७० हजार युवकांनी नोंदणी केलेली आहे हे खरे असून, सप्टेंबर, २०२० अखेर ५०० तरुणांना रोजगार मिळाला आहे, हे खरे नाही.

(४) व (५) लागू नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात विशेषत: पुणे येथील कृषी खात्याच्या गुणनियंत्रण विभागातील ऑनलाईन प्रणाली सुरु करण्याबाबत

**(३०) ५२३० (१८-११-२०२०). श्री.महादेव जानकर, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खते, बियाणे, किटकनाशकांच्या राज्यपातळीवर कंपन्यांना विक्री व उत्पादनाचे परवाने कृषी आयुक्तालयात गुणनियंत्रण विभागाकडून दिले जातात, कृषी आयुक्तालयाने दहा वर्षांपूर्वी ई-परवाना यंत्रणा लागू केली होती व परवान्यासाठी ऑनलाईन माहिती अर्ज सादर करावा लागतो, परंतु गेल्या दोन महिन्यापासून राज्यातील विशेषत: पुणे येथील ऑनलाईन परवाना प्रणाली बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन परवाने बंद पाडण्यामागे कृषी खात्यातील अर्थकारण जबाबदार असून पुन्हा निविष्ठा विक्रीचा परवाना मिळवून व्यवसाय करण्याचा पर्याय देखील कृषी विभागाने हिरावून घेतला असल्याचा आरोप संस्थापक अध्यक्ष कृषी पदवीधर संघटना यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ऑनलाईन परवाना मिळण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणून निविष्ठा परवाना वाटपाची ऑनलाईन प्रणाली सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२३-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) कृषी पदवीधर संघटनेचे पत्र प्राप्त झाले आहे, परंतु संघटनेने केलेले आरोप खरे नाहीत.
(३) किटकनाशके, खते व बियाणे या निविष्ठांसाठी परवाना अधिकारी म्हणून जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी यांना सन २०१७-२०१८ मध्ये घोषित करण्यात आलेले आहे. जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी यांना परवाना अधिकारी घोषित केल्यापासून, म्हणजे जानेवारी, २०१८ पासून पुणे कार्यालयास ५३२७ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, पुणे या कार्यालयामध्ये जानेवारी, २०१८ ते डिसेंबर, २०१८ पर्यंत १६८६ प्रस्ताव प्राप्त झाले. सदर सर्व प्रस्तावांना ३० दिवसामध्ये मंजूरी दिली आहे. जानेवारी, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या कालावधीत २०२५ प्रस्ताव प्राप्त झाले. या प्रस्तावांना विहित मुदतीत मंजूरी दिली आहे. जानेवारी, २०२० ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीत एकूण १६१६ प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी तपासणीअंती ८८६ प्रस्तावांना विहित कालमर्यादेत मंजूरी दिली आहे. माहे २३ जून, २०२० ते २० सप्टेंबर, २०२० मध्ये तांत्रिक अडचणीमुळे ई-परवाना संकेतस्थळ बंद असल्यामुळे या कालावधीत प्राप्त झालेले ७३० प्रस्तावांपैकी नुतनीकरण व सुधारणांच्या ५२४ प्रस्तावांना ऑफलाईन मंजूरी देण्यात आलेली आहे. उर्वरित नवीन २०६ तपासणी झालेल्या प्रस्तावांना संकेतस्थळ सुरु झालेनंतर दिनांक २१/०९/२०२० रोजी मंजूरी देण्यात आलेली आहे.

अशाप्रकारे एकूण प्राप्त ५३२७ प्रस्तावांपैकी ५१२१ प्रस्तावांना कालमर्यादेत मंजूरी देण्यात आलेली आहे. उर्वरित २०६ प्रस्तावांना ई-परवाना संकेतस्थळ सुरु झाल्यानंतर मंजूरी देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विशेषत: वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील नागरिकांना मालमत्ता करात सुट देण्याबाबत

**(३१) ५२६१ (२०-११-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील नगरपालिकाक्षेत्रात कोरोना संकटामुळे दिनांक ३१ मार्च, २०२० रोजीपर्यंत मालमत्ता कराचा भरणा न करू शकलेल्या नागरिकांना थकित मालमत्ता करावर लावण्यात येणारी २ टक्के शास्ती दंडाच्या आकारणीत सुट देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.नगर विकास मंत्री यांना दिनांक २९ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टाळेबंदीच्या काळात नागरिक कामधंदा व रोजगारापासून वंचित असल्याने आर्थिक अडचणीमुळे कराची रक्कम भरू न शकणाऱ्या मालमत्ताधारकांना करात सुट देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) या संदर्भात सूट देण्याची कोणतीही बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद येथील साजापुर शिवारात वापरलेले ग्लोव्हज जप्त केल्याबाबत

**(३२) ५२७० (१३-११-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील साजापुर शिवारातील गोडाऊनवर मुंबई गुन्हे शाखा व एमआयडीसी वाळुज पोलिसांनी १९ टन वापरलेले ग्लोव्हज जप्त केल्याची घटना माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२६-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर बाबत दिनांक १९/०८/२०२० रोजी नवी मुंबई आयुक्तालयांतर्गत तुर्भे एमआयडीसी पो. ठाणे येथे गु.र.क्र.३१६/२०२० भादंवि कलम ४२०, १८८, २७०, ३३६, ३०८, ३४ सह कलम ५१(ब) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ सह कलम ३ साथीचे रोग अधिनियम १८९७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यात तपासादरम्यान नवी मुंबई पोलिसांनी साजापुर, वाळुज, औरंगाबाद येथील गोडाऊनवर एमआयडीसी वाळुज, औरंगाबाद शहर पोलिसांच्या मदतीने १९ टन वापरलेले ग्लोव्हज जप्त केले आहेत.

सदर गुन्ह्यात सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांना मा.न्यायालयाने जामिनावर मुक्त केले आहे. तसेच एका आरोपीस मा.न्यायालयात अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

गुन्हा तपासावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मराठा समाजाला आरक्षण लागू करण्याबाबत

**(३३) ५३७८ (१३-११-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.कपिल पाटील, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठा समाजाला आरक्षण लागू करण्याची कार्यवाही सुरु झालेली असताना मा.सर्वोच्च न्यायालयामार्फत मराठा आरक्षणास स्थगिती देण्यात आल्याने विविध संघटनेव्दारे मोर्चा काढण्यात आले असून राज्यात अनेक भागात आरक्षणाच्या समर्थनार्थ काढलेल्या आंदोलनास हिंसक वळण लागले असल्याने आरक्षणाचा प्रश्न दिवसेदिवस गंभीर होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरक्षणाला मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यानंतर मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या प्रश्नाबाबत निर्णय झाला नसून ज्या विद्यार्थ्यांनी स्थगितीपूर्वी शासकीय नोकरभरतीच्या परीक्षा दिलेल्या आहेत, मुलाखती झालेल्या आहेत त्यांच्याबाबत शासनाने काही निर्णय घेणे आवश्यक असल्याचेही निदर्शनास आले आहे तसेच मराठा तरूणांना आर्थिक दुर्बलचे १०% आरक्षण मिळणार नसून कुठल्या आरक्षणात भाग घ्यायचा आणि कुठल्या नाही याचा अधिकार व्यक्तीला असताना आर्थिक दुर्बलतेचे आरक्षणावर निर्बंध लावण्याचा निर्णयही शासनामार्फत घेण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठा आरक्षण आंदोलनाच्यावेळी ४० पेक्षा अधिक जणांनी आपले बलिदान दिले असून बलिदान दिलेल्यांच्या कुटुंबियांना शासकीय नोकरी व दहा लक्ष रुपयांच्या मदतीची घोषणा शासनाकडून करण्यात आली होती, त्यापैकी काही कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाखांची आर्थिक मदत शासनाच्यावतीने देण्यात आली असून आर्थिक मदतीची संपूर्ण रक्कम तसेच नोकरी देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मराठा आरक्षणाशी निगडीत सर्व बाबींची पुर्तता करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२२-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिका यामध्ये दिनांक ९/०९/२०२० रोजी दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशानुसार सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षातील दिनांक ०९/०९/२०२० नंतरची सर्व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश प्रक्रिया एसईबीसी वर्गाकरीता आरक्षण न ठेवता पार पाडण्याबाबत तसेच ज्या विद्यार्थ्यांनी दिनांक ९/०९/२०२० पूर्वी एसईबीसी प्रवर्गातून प्रवेशाकरीता अर्ज केले असतील परंतु त्यांना प्रवेश देण्यात आले नसतील अशा एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश देण्याबाबतचे निदेश दिनांक २४/११/२०२० च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.

नोकर भरतीच्या परीक्षा व मुलाखती दिलेल्या उमेदवारांबाबत ज्येष्ठ विधिज्ञांच्या सल्ल्यानुसार लवकरच योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

तसेच दिनांक २३/१२/२०२० च्या शासन निर्णयान्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील (एसईबीसी) उमेदवारांना सन २०२०-२०२१ या वर्षातील शैक्षणिक प्रवेश घेण्यासाठी व सरळसेवा भरतीकरीता आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे (ईडब्ल्यूएस) प्रमाणपत्र देण्यास मान्यता दिली आहे.
(३) व (४) मराठा आरक्षण आंदोलनाच्यावेळी बलिदान दिलेल्यांच्या कुटुंबियांना शासकीय नोकरी व दहा लक्ष रुपयांच्या मदतीची घोषणा शासनाने केली नव्हती. सदर घोषणा स्थानिक पातळीवरुन करण्यात आली होती.

मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत पावलेल्या आंदोलकांच्या कुटुंबातील एका अवलंबितास त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरी देण्याबाबत गृह विभागाने परिपत्रक क्र.२८/२०२० दिनांक २८/०९/२०२० अन्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. मराठा आंदोलनात मृत्यूमुखी पडलेले उस्मानाबाद व परभणी जिल्ह्यातील अनुक्रमे ०२ व ०१ अशा ०३ आंदोलक व त्यांच्या कुटुंबियांची यादी राज्य परिवहन महामंडळास प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने कुटुंबातील एका अवलंबितास त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार अनुकंपा तत्वावरील पदांमध्ये त्यांचे अर्ज व इतर कागदपत्रे घेण्यात येऊन संबंधित विभागामध्ये तात्काळ नेमणूक देण्याबाबतच्या सूचना पत्र क्र. ५१, दिनांक ५/१०/२०२० व क्र.३५१८, दिनांक १२/११/२०२० अन्वये विभाग नियंत्रक, उस्मानाबाद व परभणी विभाग यांना देण्यात आल्या असून नेमणूक देण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच मृत झालेल्या १७ प्रकरणी त्यांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य प्रदान करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील अवैध धंदे रोखण्याबाबत

**(३४) ५४१० (१२-११-२०२०). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात क्रिकेटचा सट्टा, अवैध दारु विक्री, चोरीचे प्रमाण, मटक्याचे अड्डयाचे प्रमाण वाढत असल्याने नागरिकांमध्ये प्रामुख्याने महिला वर्गामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून उक्त अवैध धंद्यांबाबत स्थानिक पोलिसांना माहिती असूनही याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड शहर व परिसरात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून घरफोड्या, मोबाईल पळवणे, महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावणे, लुटमार करणे, वाहनचोरी इत्यादी गुन्ह्यात वाढ झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून नांदेड शहरातील मगनपुरा भागातील प्रेमलता जुगलकिशोर बहेती या रस्त्यावरुन पायी जात असताना त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र दुचाकीवरुन आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी हिसकावून पसार झाले, याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊनही कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदेड शहर व आसपासच्या परिसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले असल्याने महिला, वृध्द व्यक्तींमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील अवैध धंदे करणाऱ्यांवर कारवाई करुन सदरील अवैध धंदे रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२२-०२-२०२१) :** (१) नांदेड जिल्ह्यात माहे जानेवारी, २०२० ते ऑक्टोबर, २०२० महिन्यात खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र दारुबंदी अधि. अंतर्गत एकूण १५४४ गुन्हे दाखल असून त्यात एकूण १६४० आरोपींना अटक करुन रुपये ५३,०७,१५८/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

तसेच महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधि. अंतर्गत एकूण ५३१ गुन्हे दाखल असून त्यात एकूण १४२९ आरोपींना अटक करुन रुपये २६,३१,९२५/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

तसेच माहे ऑक्टोंबर, २०२० या महिन्यात नांदेड जिल्ह्यात चोरी या सदराखाली एकूण १३० गुन्हे दाखल असून १९ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. उर्वरित गुन्हे उघडकीस आणण्याचे दृष्टीने तपास चालु आहे. नागरीकांकडून करण्यात आलेल्या तक्रारीची तात्काळ दखल घेवून कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) नांदेड जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०२० महिन्यात जबरी चोरी या सदराखाली एकूण २० गुन्हे दाखल असून ११ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. त्यात एकूण रुपये १,८१,९७४/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

दिनांक १२/१०/२०२० रोजी नांदेड शहरातील मगनपुरा भागातील प्रेमलता बाहेती यांचे गळ्यातील मंगळसुत्र अज्ञात आरोपींताकडून चोरुन नेले प्रकरणी पोलीस स्टेशन शिवाजीनगर, नांदेड येथे गु.र.नं. ३७४/२०२० कलम ३९२, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून चोरीला गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

(३) व (४) नांदेड जिल्ह्यात माहे जानेवारी, २०२० ते ऑक्टोंबर, २०२० या कालावधीत दाखल जबरी चोरीच्या गुन्ह्यांपैकी ६५ गुन्हे उघडकीस आले असून एकूण रुपये २८,२७,३९४/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

नांदेड शहरात चोरी व जबरी चोरीच्या गुन्ह्यास प्रतिबंध करण्यासाठी नियमित रात्रगस्त, पेट्रोलिंग, नाकाबंदी व मालमत्ता संबंधाने सक्रीय गुन्हेगारांना वेळोवेळी चेक करुन, त्यांच्याविरुध्द परिणामकारक प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येत आहे.

नांदेड जिल्ह्यात चोरुन लपून जुगार चालविणारे तसेच अवैध दारुच्या विक्री संबंधाने दोषीविरुध्द विविध कायद्यांतर्गत माहे जानेवारी, २०२० ते ऑक्टोंबर, २०२० या कालावधीत एकूण ८८२३ प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

## राज्यात कोळी बांधवांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(३५) ५४४४ (१८-१०-२०२०). श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नियमानुसार माहे जून-जुलै या कालावधीमध्ये मासेमारी करण्यास बंदी असल्याने उक्त दोन महिन्यासाठी मासेमारी न करणाऱ्या कोळी बांधवांच्या उदरनिर्वाहकरीता तामिळनाडू राज्यात दोन महिन्याकरीता रुपये दहा हजार नुकसान भरपाई दिली जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान अवगत झाले असून त्याच धर्तीवर राज्यातील कोळी बांधवांना माहे जून-जुलै या मासेमारी बंदी कालावधीत उदरनिवार्हाकरीता रुपये दहा हजार नुकसान भरपाई देण्याची मागणी राज्यातील लोकप्रतिनिधी व मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवानी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात मासेमारी बंदी कालावधीत मच्छिमार कोळी बांधवांना रुपये दहा हजार नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (३०-११-०००२) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरूड (ता.मुरुड, जि.रायगड) बस स्थानकाची दुरुस्ती करण्याबाबत

**(३६) ५६३८ (१८-११-२०२०). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निसर्ग चक्रीवादळ, तसेच माहे ऑगस्ट, २०२० च्या पहिल्या आठवड्यात वादळी वाऱ्यासह पडलेल्या पावसामुळे मुरूड आगाराच्या बस स्थानकाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुरूड आगाराच्या बस स्थानक इमारतीच्या भिंतींना मोठ्या प्रमाणावर तडे गेल्यामुळे तसेच बस स्थानक इमारतीच्या दुरवस्थेमुळे अपघात झाल्यास वाहतूक नियंत्रक, वाहन चालक-वाहक तसेच नागरिक व प्रवाशांच्या जिवितेला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुरूड-जंजिरा पर्यटन स्थळ असल्याने याठिकाणी पर्यटकांची सातत्याने ये-जा होत असल्यामुळे सदर बस स्थानकाची दुरूस्ती करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२२-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) बस स्थानकाचा सांगाडा हा लोखंडी खांब, राप-टर व पर्लिनवर आधारीत असून दोन लोखंडी खांबामधील भिंतीला तडा गेला आहे. बस स्थानकावरील छताचे तुटलेले पत्रे आगार पातळीवर काढून घेण्यात आलेले असून, वाहतूक नियंत्रण कक्ष रिकामा करुन घेण्यात आला आहे. त्यामुळे कोणाच्याही जिवितास धोका नाही.
(३) चक्री वादळानंतर बस स्थानक दुरुस्तीच्या रुपये ६,७४,८१२/- रकमेच्या अंदाजपत्रकास महामंडळाच्या स्तरावरुन मंजुरी प्राप्त झालेली असून, त्यानुसार निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे फुरसुंगी (ता.हवेली, जि.पुणे) येथील रस्ता सिमेंट काँक्रिटीकरण करण्याबाबत

**(३७) ५६६१ (२०-११-२०२०). श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २५०० ला दिनांक ११ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे फुरसुंगी, गणेशनगर वार्ड क्र.१, (ता.हवेली, जि.पुणे) येथील श्रीजी टेक्स्टाईल ते हरपळे टेम्पो सर्व्हिस या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात आले असून श्रीजी टेक्सटाईल ते शब्दमंदार कुंज येथील रस्ता सिमेंट काँक्रिटीकरण करण्याचे पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे नियोजन होते, परंतु, हरपळे टेम्पो सर्व्हिस ते शब्दमंदार कुंज दरम्यानची जागा खाजगी व्यक्तींची असल्याने रस्ता काँक्रीटीकरण करण्यात आले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात आलेल्या श्रीजी टेक्सटाईल ते हरपळे टेम्पो सर्व्हिस ह्या रस्त्याची जागा सुध्या खाजगी व्यक्तींच्या मालकी हक्काची असतानाही सदर खाजगी जागेवरील रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागेवर रस्ता बांधण्यासाठी तत्कालीन ग्रामपंचायतीने मंजुरी दिली होती काय तसेच शासनाच्या कोणत्या विभागामार्फत उक्त रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यास परवानगी देण्यात आली होती,

(४) तसेच हरपळे टेम्पो सर्व्हिस ते शब्दमंदार कुंज येथील रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्याचे पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाचे नियोजन असताना तसेच संबंधित जागेच्या मालकाने दिनांक १४ मे, २०१९ रोजीचा करारनामा (सहायक दुय्यम निबंधक वर्ग-२, हवेली क्र.६, दस्त अनुक्रमांक हवेली ६-५०६०-२०१९) दस्तनुसार कायमस्वरूपी रस्ता वापरण्याचा हक्क दिला असतानाही सदर रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण न करण्याची कारणे काय आहेत तसेच श्रीजी टेक्सटाईल ते हरपळे टेम्पो सर्व्हिस येथील जागा सुध्या खाजगी व्यक्तींची असताना येथील रस्ता सिमेंट काँक्रिटीकरण करण्याचे कारण काय आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यानुषंगाने श्रीजी टेक्सटाईल ते शब्दमंदार कुंज रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण पुणे महानगरपालिकेकडून किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०१-२०२१) :** (१), (२), (३), (४) व (५) फुरसुंगी, गणेशनगर परिसर येथील विविध गल्लीबोळात कॉंक्रिटीकरण करण्याकरीता पुणे महानगरपालिकेने निविदा काढलेली होती.

त्यावेळी हा भाग पुणे महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर म्हणजेच ग्रामपंचायत हद्दीत होता. मात्र कचरा डेपोसंदर्भात तेथील ग्रामस्थांनी केलेल्या आंदोलनाच्या अनुषंगाने सदर परिसरातील वाड क्र.१ मधील रस्ते महानगरपालिकेने करून देण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता.

ग्रामपंचायत, फुंरसुंगी यांनी दिनांक ०६/०३/२०१३ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांना सादर केलेल्या पत्रातील विकास कामांच्या यादीत गणेशनगर परिसर येथे काम करणे असा उल्लेख असून त्यामध्ये विशिष्ट अशा रस्त्याचा उल्लेख नव्हता.

त्यामुळे यादीत उल्लेख असलेल्या परिसरामध्ये जिल्हाधिकारी, पुणे येथील कार्यालयातील अधिकारी, सदर गावचे सरपंच व प्रतिनिधी यांच्यासमवेत पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळपाहणी करून परिसरातील कामांची यादी तयार केलेली होती.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त यादीस मुख्यसभा, पुणे महानगरपालिका यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी निविदा प्रक्रियेबाबत कामकाज करण्यात आले होते.

त्यास अनुसरून सदर कामाचे पूर्वगणनपत्रक तयार करण्यात आले.

तथापि, श्रीजी टेक्सटाईल ते शब्दमंदार कुंज येथील रस्ता कॉंक्रिटीकरण करण्याबाबतच्या कामाचा या यादीत उल्लेख नव्हता.

तसेच सदरची जागा ही खाजगी असून श्रीजी टेक्सटाईल ते शब्दमंदार कुंज दरम्यान रस्ता करण्याचे नियोजन होते. तथापि, या जागेबाबत दोन मालकांमध्ये वाद असल्याने सदरच्या कामाचा यामध्ये समावेश नव्हता, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, श्रीजी टेक्सटाईल ते हरपाळे टेम्पो सर्व्हिस या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्यात आले असून श्रीजी टेक्सटाईल ते शब्दमंदार कुंज या जागेबाबत कोणतीही कागदपत्रे पुणे महानगरपालिकेमध्ये जमा करण्यात आलेली नाहीत.

परंतु विषयांकित प्रकरणी योग्य ती कागदपत्रे भविष्यात पुणे महानगरपालिकेकडे उपलब्ध करून देण्यात आल्यास याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## किनगाव (ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद) येथील कनिष्ठ महाविद्‌यालय वारेगाव येथे सुरु करण्याबाबत

**(३८) ५७०० (१८-११-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनगाव (ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद) येथील शासनाची मान्यता असलेले कनिष्ठ महाविद्‌यालय वारेगाव येथे सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू महाविद्‌यालयाने शासनाच्या निकषानुसार विद्‌यार्थ्यांना उपलब्ध करुन द्‌यावयाच्या सोयी सुविधाही दिल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार विद्‌यार्थ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-०२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर उच्च माध्यमिक शाळा मान्यता दिलेल्या ठिकाणी सुरू नसल्याने उक्त उच्च माध्यमिक शाळेची मान्यता आपोआप रद्द झाली आहे, असे विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी सदर संस्थेस कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्ह्यातील सर्व सदस्यांना आरोग्य विमा संरक्षण देण्याबाबत

**(३९) ५७११ (२०-११-२०२०). डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील सर्व नगरपालिका, जिल्हा परिषद, नगर परिषद व पंचायत समितीच्या सर्व सदस्यांना कोणत्याही प्रकारचे आरोग्य विमा कवच नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या दुसरा सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व सदस्यांना आरोग्य विम्याचा लाभ मिळण्यासाठी त्यांची मेडिक्लेम पॉलिसी काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०२-२०२१) :** (१) व (२) राज्यातील अथवा यवतमाळ जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायतीच्या सर्व सदस्यांना आरोग्य विमा संरक्षण देण्याबाबत कोणतीही कार्यवाही प्रस्तावित नाही.

तसेच राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सर्व सदस्यांना आरोग्य विमा संरक्षण देण्याबाबत ग्रामविकास विभागामार्फत सद्य:स्थितीत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, असे ग्रामविकास विभागाने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गरीब व गरजू आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याबाबत

**(४०) ५७५१ (२३-११-२०२०). श्री.जयंत पाटील, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.नरेंद्र दराडे, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, डॉ.परिणय फुके, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.प. ७ (५३)

(१) दुर्गम भागात आणि आश्रमशाळेत शिकणारा आदिवासी विद्यार्थी भ्रमणध्वनी अभावी कोरोना काळात ऑनलाईन शिक्षण घेऊ शकत नाही, त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना घरीच शिक्षण मिळावे म्हणून आदिवासी विभागाने अनलॉक शिक्षण पध्दती आणली, मात्र ही शिक्षण पध्दती अंमलात येण्याआधीच असफल झाल्यामुळे राज्यातील ११५३ आश्रमशाळेमधील सुमारे ५ लाखांहून अधिक आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या अनलॉक शिक्षण पध्दतीचे आयुक्त कार्यालयाने आदिवासी विभागाच्या प्रधान सचिवासमोर सादरीकरण केले, त्यानुसार या पध्दतीतील मुलांना पुस्तके देण्याचा पहिला टप्पा पार पडला असून दुसऱ्या टप्प्यात आठवड्यातून दोनदा शिक्षक विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शिकवतील आणि तिसऱ्या टप्प्यात विद्यार्थ्यांनी हा अभ्यास किती ग्रहण केला याचा आढावा घेण्यात येईल, या पध्दतीने ही शिक्षणपध्दती विकसित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांपर्यंत पुस्तके पोहचवल्यानंतर यंत्रणा पुढे गेलीच नाही इतकेच नव्हेतर आश्रमशाळेतील शिक्षकांना खावटी अनुदान योजना राबविण्यासाठी कुटुंब सर्वेक्षणाचे कामात गुंतवले व या प्रकाराकडे आदिवासी विभागाचे मंत्री, वरिष्ठ अधिकारी आदींनी आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे संपूर्णत: दुर्लक्ष केले परिणामी राज्यातील ५ लाखांहून अधिक आदिवासीच्या शिक्षणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणत्याही प्रकारे खंड पडू नये यादृष्टीने अस्तित्वात असलेल्या सर्व उणिवा सत्वर दूर करून दुर्गम भागातील गरीब व गरजू आदिवासी विद्यार्थ्यांना शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१७-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

शासन निर्णय, क्र.खाअयो-२०२०/प्र.क्र.३७/का.०३, दिनांक ३० सप्टेंबर, २०२० अन्वये आदिवासी विकास विभागात कार्यरत स्थानिक कर्मचारी (आदिवासी विकास निरीक्षक, शिक्षक, गृहपाल, अधिक्षक इ.) यांना खावटी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांची यादी निश्चित करुन अर्ज भरुन घेण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. सदर खावटी योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी काही शिक्षकांवरच ग्राम समिती सदस्य म्हणून जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. सदर खावटी योजनेकरीता नियुक्त केलेल्या शिक्षकांचे शैक्षणिक कामकाजाचे वाटप महिला शिक्षिका, स्त्री-अधिक्षिका, पुरुष अधीक्षक व मुख्याध्यापक तसेच उर्वरित शिक्षक, कर्मचारी यांच्याकडे वाटप करण्यात आले होते. अनलॉक उपक्रमांतर्गत गाव-पाड्यांवर स्वयंस्फुर्तीने स्थानिक संसाधन समुह शिक्षणाचे काम करीत असल्यामुळे खावटी सर्वेक्षणाचे काम सुरु असतानाही मुलांच्या शिक्षणामध्ये खंड पडणार नाही याची दक्षता शाळास्तरावरुन घेण्यात आलेली आहे. खावटी योजनेंतर्गत सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाल्यानंतर या प्रयोजनासाठी नियुक्त केलेले शिक्षकसुध्दा अनलॉक लर्निंग उपक्रमात नियोजनानुसार सहभागी झालेले आहेत.

(४) राज्यात ऑनलाईन शिक्षण देण्याचा एक मतप्रवाह सुरु असताना आदिवासी विद्यार्थी, तो राहत असलेला भाग दुर्गम व कोणत्याही प्रकारच्या ऑनलाईन सुविधा उपलब्ध नसणे या कारणाने शिक्षणापासून वंचित राहिलेला नाही. अनलॉक लर्निंगव्दारे विद्यार्थ्याच्या दारी शिक्षण पोहचविण्यासाठी सुनियोजित आखणी करुन शिक्षक, स्थानिक संसाधन समुह यांच्याव्दारे “अनलॉक लर्निंग” हा ऑफलाईन शिक्षणाचा उपक्रम सुरु ठेवलेले आहे. सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळांकडून गाव-पाडा निहाय विद्यार्थ्यांच्या याद्या तयार करण्यात आल्या असून आश्रमशाळेतील शिक्षकांकडे गाव-पाड्याचे पालकत्व देण्यात आलेले आहे. गाव-पाडा निहाय भेटीकरीता आश्रमशाळास्तरावर साप्ताहिक/मासिक नियोजन करण्यात आले असून नियोजनानुसार शिक्षक भेटी देत आहेत.

संसाधन समूहांच्या सहकार्याने स्थानिक पातळीवर सूक्ष्म नियोजन करुन जास्तीत-जास्त विद्यार्थ्यांपर्यंत नियमितपणे पोहोचून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बार्शीटाकळी (जि.अकोला) तालुक्यात सिंचन तलाव किरकोळ स्वरूपात नादुरूस्त असल्याबाबत

**(४१) ५८१९ (१७-११-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोडगा, ब्राम्हणदरी, रेडवा, चेलका, धाबा, शेलगाव, भेंडगाव, तिदसा व भेंडीमहल (ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) या नऊ सिंचन तलावांची क्षमता ५६९ हेक्टर्स (१४०० एकर) आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील सिंचन तलाव किरकोळ स्वरूपात नादुरूस्त असल्याने मागील ३० वर्षापासून दरवर्षी फक्त ५ टक्केपेक्षा कमी सिंचन निर्मिती होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने सिंचन निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (१६-०२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर ९ तलावांचे कालवे नादुरुस्त असले तरी लाभक्षेत्रातील शेतकरी स्वखर्चाने मोटरपंपाव्दारे तलावावरून पाण्याचा उपसा करुन सिंचन करित आहेत. याशिवाय तलावातील पाणीसाठ्यामुळे लाभक्षेत्रातील विहिरी व कुपनलिका यांची पाणी पातळी वाढली आहे. तसेच आता मा.मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत सिंचन तलावामधून कालव्याव्दारे पाणी वितरित न

करता बंद नलिका पध्दतीने पाणी वितरित करण्याचे दृष्टीने सिंचन तलावाची PDN सर्वेक्षणाची (Pipe Distribution Network) अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात नादुरुस्त बसची संख्या वाढत असल्याबाबत

**(४२) ५९९४ (०१-१२-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जिल्हापातळीवर बससाठी लागणारे साहित्य स्थानिक पुरवठादाराकडून पुरविले जात नसल्याने राज्यभरात नादुरुस्त बसची संख्या वाढत असल्याचे दिनांक २५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुरवठादारांनी साहित्य बंद केल्याने बस नादुरुस्त अवस्थेत आगारात उभ्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार जिल्हा पातळीवर नादुरुस्त बस दुरुस्त करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२२-०२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## एसटी महामंडळाचा तोटा व स्थानकांची दुरवस्था यावर उपाययोजना करण्याबाबत

**(४३) ६००४ (२५-११-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला सुमारे साडेचार हजार कोटी रुपयांचा तोटा झाला असून दररोज सुमारे तीन कोटींहून अधिक तोटा होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील एसटी स्थानकांची अतिशय दुरवस्था झाली असून प्रवाशांचे हाल होत असल्याने त्यावर उपाययोजना म्हणून राज्यातील ६०८ एसटी स्थानके प्रवाशांसाठी सुसज्य व मैत्रीपूर्ण करण्यासाठी सुमारे ३५० कोटी रुपये खर्चाची योजना राबविण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेचे स्वरुप व योजना राबविण्याची सद्य:स्थिती काय आहे, तसेच एसटी महामंडळाला तोटा होण्याची कारणे काय आहेत, सदरहू तोटा कमी व्हावा व महामंडळ सुस्थितीत यावे, यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२२-०२-२०२१) :** (१) राज्य परिवहन महामंडळाला दररोज सुमारे तीन कोटीहून अधिक तोटा होत आहे. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात रुपये ९३९.८७ कोटी निव्वळ तोटा झाला असून, दिनांक ३१/०३/२०१९ अखेर रुपये ४६०३.०८ कोटी इतका संचित तोटा झाला आहे.

(२) व (३) राज्यातील ६०८ एसटी स्थानके प्रवाशांसाठी सुसज्य व मैत्रीपूर्ण करण्याची योजना अंमलात आणली आहे. त्यानुसार शासन निधीतुन व राज्य परिवहन महामंडळाच्या निधीमधून जुन्या झालेल्या बसस्थानकांचे आधुनिकीकरण/पुनर्बांधणी/दर्जावाढ व वाढविस्तार करण्याची मोहिम राज्य परिवहन महामंडळाने सन २०११ पासून हाती घेतलेली असून, अद्यापपर्यंत ७५ बस स्थानकांची कामे पूर्ण केली आहेत व ९६ बस स्थानकांची कामे निविदा प्रक्रियेत आहेत.

राज्य परिवहन महामंडळाचा तोटा कमी व्हावा याकरीता उत्पन्नात वाढ व खर्चात कपात या धोरणानुसार सातत्याने कार्यवाही करण्यात येत आहे. या अंतर्गत कमी भारमान असणाऱ्या फेऱ्यांचा चालनीय आढावा घेऊन

भारमानात सुधारणा होण्याकरीता फेऱ्यांचे सुसूत्रीकरण, वेळांमध्ये बदल, फेऱ्या स्थगित ठेवणे, जास्त भारमान असलेल्या मार्गांवर फेऱ्या वाढविणे इ. उपाययोजना करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुखेड (जि.नांदेड) शहरात सराफा व्यापाऱ्यास लुटण्याची घटना घडल्याबाबत

**(४४) ६०८२ (१३-१२-२०२०). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) शहरात पिस्तुलचा धाक दाखवून सराफ/व्यापाऱ्यास लुटण्याचा काही जणांनी प्रयत्न केल्यामुळे येथील व्यापाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिनांक २ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर गुन्ह्याची माहिती घेऊन दोषींना अटक करुन अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०४-०२-२०२१) :** (१) व (२) सदर प्रकरणी दिनांक ०१/११/२०२० रोजी पोलीस स्टेशन, मुदखेड, जिल्हा नांदेड येथे गु.र.नं. २१८/२०२० भा.दं.वि. कलम ३९३, ३९४, ३९८ सह हत्यार कायद्याचे कलम ७/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींची मा.न्यायालयाकडून पोलीस कोठडी रिमांड घेवून, तपास करण्यात आला असून आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल, पिस्टल व ३ जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहेत. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## नेर-नागनाथवाडी ते ललगूण (ता.खटाव, जि.सातारा) रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत

**(४५) ६१०७ (२३-११-२०२०). श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेर-नागनाथवाडी ते ललगूण (ता.खटाव, जि.सातारा) या ५.०० कि.मी. रस्त्याच्या कामास सन २०१८ मध्ये शासनाने मान्यता देऊन त्यासाठी रुपये ३३४.६७ लक्ष रुपयांची आर्थिक तरतूद मंजूर केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत घेण्यात येऊन दिनांक ३ ऑगस्ट, २०१८ रोजी या कामाचे कंत्राट ओमकार कन्स्ट्रक्शन या कंपनीस देण्यात आले असून निविदा प्रक्रियेनुसार सदर काम दिनांक २ डिसेंबर, २०२० रोजीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असताना काम बंद पडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम तात्काळ सुरु करावे अशी मागणी तेथील ग्रामस्थ व नागरिकांनी माजी मंत्री महोदयांसह मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मा.ग्रामविकास मंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रस्त्याचे काम बंद पडण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१०-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत काम प्रगतीत असून बंद पडलेले नाही. सदर काम कोरोना कालावधीतील लॉकडाऊन व अतिवृष्टी या कारणास्तव मार्च, २०२० ते दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० पर्यंत बंद होते. तसेच सा.क्र. २/४६० ते

सा.क्र.२/६०० च्या १४० मी. लांबीत मातीकाम केल्यानंतर रस्त्याच्या आखणीच्या वादामुळे पुढे काम करता आले नाही. सदर वाद दिनांक ७/११/२०२० रोजी संबंधित शेतकऱ्यांशी चर्चा करुन मिटवण्यात आला आहे.

(३) सदर निवेदन दिल्याचे आढळून आले नाही.

(४) कोरोना कालावधीतील लॉकडाऊन व अतिवृष्टी या कारणास्तव मार्च, २०२० ते १५ ऑक्टोबर, २०२० पर्यंत बंद होते. तसेच सा.क्र. २/४६० ते सा.क्र. २/६०० च्या १४० मी. लांबीत मातीकाम केल्यानंतर रस्त्याच्या आखणीच्या वादामुळे पुढे काम करता आले नाही. सदर वाद दिनांक ७/११/२०२० रोजी संबंधित शेतकऱ्यांशी चर्चा करुन मिटवण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत काम प्रगतीत असून डिसेंबर, २०२० अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत आश्रमशाळांच्या अनुदानाची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(४६) ६१८९ (१४-१२-२०२०). श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या मान्यता प्राप्त अनुदानित भटक्या जमातींच्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळांसाठीचे परिपोषण अनुदान व वेतनेत्तर अनुदानाची देयके प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार प्रलंबित देयके देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२०-०१-२०२१) :** (१) होय.
(२) वित्त विभागाने कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून दिनांक ४ मे, २०२० च्या शासन निर्णयास अनुसरुन या प्रयोजनार्थ मुळ अर्थसंकल्पीय तरतूदींपैकी २५ टक्के म्हणजेच रुपये २५५.०० कोटी इतक्या तरतूदींपैकी रुपये ६३.७५ कोटी इतका निधी उपलब्ध केला आहे. सदरहू सर्व निधी संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग यांना वाटप करण्यात आला आहे. उर्वरीत रुपये १९१.२५ कोटी इतका निधी उपलब्ध करणेबाबत वित्त विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील पदे पदोन्नतीने भरण्याबाबत

**(४७) ६१९४ (२०-११-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० या नियमावलीला शासनाकडून दिनांक १८ फेब्रुवारी, २०२० रोजी मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उप अभियंता (पर्यावरण) या पदावर कनिष्ठ अभियंता संवर्गातून १००% पदोन्नतीने पदे भरण्याकरीता पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने परिपत्रक देखील काढले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नगर विकास विभागाने दिनांक १५ सप्टेंबर, २०२० रोजी पदोन्नतीची प्रक्रिया सेवाप्रवेश नियमानुसार करणेबाबत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस कळविले असूनही कनिष्ठ अभियंता संवर्गातून १००% पदोन्नतीने भरावयाची पदे गत १० महिन्यापासून म्हणजेच माहे नोव्हेंबर, २०२० च्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत भरण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पदोन्नतीच्या प्रक्रियेस होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०१-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) या प्रकरणी आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी दिनांक ०७/१२/२०२० च्या पत्रान्वये शासनाचे मार्गदर्शन मागितले असून त्यानुषंगाने शासनस्तरावर तपासणी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कामतघर (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील अतिधोकादायक इमारती निष्कासित करण्याबाबत

**(४८) ६२८३ (२०-११-२०२०). श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे कामतघर (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्वे क्रमांक ३४/१/४, म्यू. घर क्र.७८ (नवीन कणेरी, पद्मा नगर) मौजे कामतघर, सर्वे क्र. १०/१/२/३, म्यू. घर क्र. १९२ (नवीन कणेरी-पद्मा नगर) या जागेतील अनधिकृत धोकादायक इमारतीवर निष्कासनाची कारवाई करणेबाबत दिनांक ११ सप्टेंबर, २०२० रोजी मा.मुख्यमंत्री व दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजी भिवंडी महानगरपालिका यांचेकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दहा वर्षे जुनी व अतिधोकादायक इमारती त्वरित निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-०१-२०२१) :** (१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे कामतघर (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील म्यू. घर क्र.७८ व म्यू. घर क्र. १९२ या जागेतील अनधिकृत धोकादायक इमारतीवर निष्कासनाची कारवाई करण्याच्या अनुषंगाने तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

सदरच्या तक्रारी आयुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांना आवश्यक त्या नियमोचित कार्यवाही करण्याकरीता पाठविल्या आहेत.
(२) सदर प्रकरणी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे :-

- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे कामतघर (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील म्यू. घर क्र.७८ व म्यू. घर क्र. १९२ या जागेवरील बांधकामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६५ (अ) व ३९८ (अ) अन्वये संरचनात्मक निरीक्षण नोटीस बजावण्यात आल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
- तसेच उपरोक्त मिळकतीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६४, ३९७ (अ) व ४७८ तरतुदीन्वये नोटीस भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमार्फत बजावण्यात आली आहे.
- तथापि, सदर इमारतीचा संरचनात्मक निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याची तजविज भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकने ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## न्यु लूक कन्स्ट्रक्शन कंपनीच्या विकासकाने पुनर्विकासात फसवणूक केल्याबाबत

**(४९) २३५२१ (०४-०१-२०१७). ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळ (मुंबई) येथील एच.ए.हमीद नावाच्या चाळीत राहणाऱ्या जवानाची न्यु लूक कन्स्ट्रक्शन कंपनीच्या विकासकाने पुनर्विकासात फसवणूक केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, सदर जवान आणि त्याचे वडील यांना एच.ए.हमीद आणि रोहिदास चाळीतील घराच्या पुनर्विकासित इमारतीत सदनिका देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२३-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

मुंबईतील परळ येथील संत रोहिदास व समता सीएचएस या नावाने योजना सुरु आहे. या प्रकरणी श्री.वसंत गंगाराम बने यांचा तक्रार अर्ज झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दिनांक १८/११/२०१६ रोजी प्राप्त झाला आहे.
(२) तक्रार अर्जामध्ये तक्रारदाराने पात्रतेप्रमाणे दोन निवासी सदनिका वाटप करण्याबाबत मागणी केलेली आहे. श्री.वसंत बने यांना एक अनिवासी सदनिका पूर्वीच वाटप केली आहे, पुरवणी परिशिष्ट-२ मधील पात्रतेनुसार एक निवासी सदनिका वाटप करण्यात येत आहे.

तसेच तक्रारदारास जो अनिवासी गाळा पूर्वी वाटप झालेला आहे, त्याबाबत सहकारी संस्था त्यांना देखभाल खर्चाची मागणी करत आहे जे चुकीचे आहे म्हणून त्याची चौकशी करावी अशी मागणी केली आहे. यानुषंगाने कार्यवाही सुरु आहे. तक्रारदाराची निवासी सदनिका पात्रता मूळ परिशिष्ट-२ मध्ये झालेली नसून ते अपिलामध्ये पात्र झाले आहेत. त्यांची मूळ योजनेमध्ये सदनिका शिल्लक असल्यामुळे त्यांना एक निवासी सदनिका वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) श्री.वसंत बने यांना एक अनिवासी सदनिका यापूर्वीच वाटप करण्यात आलेली आहे. पुरवणी परिशिष्ट-२ मधील पात्रतेनुसार एक निवासी सदनिका वाटप करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मानखुर्द आणि वडाळा येथील संक्रमण शिबिरातील प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाबाबत

**(५०) ३७६०४ (०४-०१-२०१८). श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मानखुर्द आणि वडाळा येथील संक्रमण शिबिरातील शेकडो रहिवाशांनी दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास वीर जिजामाता रहिवाशी सेवा संघाच्या नेतृत्वाखाली आझाद मैदानात एक दिवसीय धरणे आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मानखुर्द व वडाळा येथील संक्रमण शिबिरातील प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०२-२०२१)** : (१) वडाळा येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली किंवा महानगरपालिकेच्या मालकीचे कोणतेही संक्रमण शिबिर नाही.

तथापि, वीर जिजामाता रहिवाशी सेवा संघ नामक याचिकाकर्त्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाबाबत दाखल केलेली रिट याचिका क्रमांक २५७६/२०१६ मा.न्यायालयाने दिनांक ०६/०२/२०१९ रोजी फेटाळून लावली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) मानखुर्द येथील सर्व्हे क्रमांक १३८ ए व बी या एमएमआरडीएमार्फत बांधण्यात आलेल्या संक्रमण शिबिरात स्पार्क या सेवाभावी संस्थेने महानगरपालिकेच्या रस्ते व पदपथावरील झोपडीधारकांना स्थलांतरीत केले होते.

सदर संक्रमण शिबिरातील रहिवाशांना नटवर पारेख कंपाऊंड येथील पीएपी सदनिकांमध्ये स्थलांतरीत करण्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेत मा.उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.